शुक्रवार, २८ जुलै २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 28 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-4 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

महत्त्वाची बातमी

## आमदारांना निधी वाटता मग गरीबांसाठी पैसे का नाही : जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गरीब वंचित घटकांना संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळावा यासाठी उत्पन्न मर्यादा २१ हजारहून ५० हजारपर्यंत वाढवण्यात यावी अशी मागणी आज लक्षवेधी सुचनेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. ही मागणी करत असताना 'हे सरकार फक्त धनिकांचा विचार करत आहे, गरीबांचाही विचार करा' असे म्हणत त्यांनी मंत्री हसन मुश्रीफ यांना घेरले. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, आज रुपयाचे अवमूल्यन मोठ्या प्रमाणात झाले आहे. २१ हजारांची किंमत आज जवळपास ५ ते ७ हजार रुपयांपर्यंत झाली आहे. याचा विचार करून ही मर्यादा वाढवण्यात यावी. आमदारांना ५० कोटी, १०० कोटी, ५०० कोटी रुपये निधीच्या माध्यमातून वाटण्याचा कार्यक्रम सुरू आहे. मग गरीब जनतेसाठी हे सरकार आखडते हात का घेत आहे ? हे सरकार गरीबांचे नसून धनिकांचे आहे हे यातू सिद्ध होते असा आरोप त्यांनी केला. उत्पन्नाची मर्यादा ५० हजार झाली पाहिजे अशी खुद्द मंत्री हसन मुश्रीफ यांची खासगीत भूमिका राहिली आहे. मात्र आज टप्प्याटप्प्याने मर्यादा वाढवू असे उत्तर देत हसन मुश्रीफ हे टप्प्याटप्प्याने आपली भूमिका बदलत आहे असा चिमटा त्यांनी काढला. राज्याचे अर्थमंत्री हे तुमचेच आहे. ते तुमच्या मताचे आहे त्यामुळे कोणतीही चिंता न करता ही मर्यादा ५० हजार करा अशी मागणी त्यांनी लावून धरली.

चर्चेतली बातमी

## अंजलीला फरपटत नेणाऱ्या आरोपींविरोधात चालणार हत्येचा खटला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दिल्लीतल्या कंझावाला या भागात १ जानेवारी २०२३ या दिवशी २० वर्षांच्या अंजली सिंहचा मृतदेह छिनविछिन्न आणि नग्न अवस्थेत आढळला होता. नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी राजधानी दिल्लीत ही घटना घडल्याने संपूर्ण देशभरात या घटनेची चर्चा झाली होती. आता या प्रकरणी दिल्लीतल्या रोहिणी कोर्टाने गुरुवारी चार आरोपींवर हत्येचा गुन्हा निश्चित केला आहे. यामुळे या प्रकरणी आता चारही आरोपींवर हत्येचा खटला चालवला जाणार आहे. दिल्लीतल्या कंझावाला भागात या तरुणीचा मृतदेह नग्नावस्थेत आणि छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला होता. अंजलीला १३ किमी फरपटत नेलं गेले. पहाटे साधारण ३.१५ च्या सुमारास एका वाटसरुने अंजलीला फरपटत नेणारी कार पाहिली. त्यानंतर ३.२४ ला पोलिसांना त्याने कळवले. या सगळ्यानंतर पहाटे ४ च्या सुमारास दिल्ली पोलिसांना तिचा मृतदेह आढळून आला. एवढंच नाही तर पोलिसांना अंजलीची स्कुटीही अपघात झालेल्या अवस्थेत आढळून आली. दिल्लीत १ जानेवारीच्या दिवशी पहाटे चार वाजता ही अंजलीच्या अपघाताची घटना समोर आली. पोलिसांना कंझावाला भागात या तरूणीचा विवस्त्रमृतदेह आढळला होता. आदल्या दिवशी रात्री म्हणजेच ३१ डिसेंबरला घरातून अंजली सहा वाजता बाहेर पडली होती आणि मी लवकरच घरी येते असे तिने आईला सांगितले होते. मात्र तिचा मृतदेहच मिळाला.

## अजित पवार नक्कीच मुख्यमंत्री होतील

### प्रफुल्ल पटेल यांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अजित पवार हे आज ना उद्या मुख्यमंत्री होतील. परंतु आत्ता मुख्यमंत्रीपद रिकामे नाही त्यामुळे यावर चर्चा कशासाठी करता ? अजित पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात आमच्या पक्षाचे नेतृत्व करत आले आहेत. काम करणाऱ्या माणसाला आज ना उद्या, उद्या नाहीतर परवा, अशी संधी नक्कीच मिळते. अनेकांना अशी संधी मिळाली आहे. त्यामुळे अजित पवारही आज नाहीतर उद्या नक्कीच मुख्यमंत्री होतील, असा दावा अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी केला.

अजित पवार लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे. अनेक नेत्यांनी अजित पवार मुख्यमंत्री होतील असा दावा केला आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटातील नेते, काँग्रेसचे नेते, अजित पवारांचे समर्थक अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत. त्यामुळे महायुतीत सर्वकाही आलबेल आहे का ? असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. अशातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीची भूमिका स्पष्ट केली. फडणवीस यांनी सांगितले, एकनाथ शिंदे हे महायुतीचे मुख्यमंत्री आहेत आणि पुढेही राहतील. तरीदेखील अजूनही काही नेते सातत्याने अजित पवार मुख्यमंत्री होतील असे दावे करत आहेत.

दरम्यान, प्रफुल्ल पटेलांच्या वक्तव्यावर भाजपाचे विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पडळकर म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी याविषयी भूमिका मांडल्यावर दुसऱ्या कोणाचे काही मत असेल तर त्याला फार काही महत्त्व राहतं असं मला वाटत नाही. महायुतीत आमचे १०५ आमदार आहेत, आमच्या बरोबर जे सात आमदार आहेत त्यांनीही त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री कोण होणार ? कसा होणार ? यावरील चर्चेला काही अर्थ नाही. पडळकर म्हणाले, अशा प्रकारचे वक्तव्य महायुतीतल्या आमच्या कुठल्या सहकाऱ्याने करण्याऐवजी पक्षाचे वरिष्ठ नेते यावर भूमिका मांडतील. आमच्या सारख्या लोकांनी यावर बोलणं योग्य नाही. आमचे नेते देवेंद्र फडणवीस आहेत. ते या विषयावर बोलले आहेत, त्यामुळे या चर्चेला आता पूर्णविराम द्यावा आणि युती धर्माचं पालन करावे.

## पावसामुळे अधिवेशनाला चार दिवस सुटी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यात पावसाने अनेक जिल्ह्याना झोडपले आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे तर काही जिल्ह्यांमध्ये पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असल्याने आमदारांना आपापल्या मतदारसंघात जाता येत नाही. आढावा घेता येत नाही. त्यामुळे अनेक आमदारांनी अधिवेशन लवकर संपवा अशी मागणी केली होती. विरोधी पक्षाच्या आमदारांनी अधिवेशन पूर्ण काळ चालविण्याची मागणी करत सरकार अधिवेशनापासून पळ काढत असल्याचा आरोप केला. त्यावर आज झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत महत्वाचा निर्णय घेण्यात आला.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये पावसाळी अधिवेशनाला चार दिवस सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विरोधी पक्षांचे गटनेते उपस्थित होते.

आज घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शनिवार, रविवार, सोमवार, मंगळवार असे चार दिवस अधिवेशन होणार नाही. तर, पुढील बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार असे तीन दिवस अधिवेशन होणार आहे. विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात पावसाचे प्रमाण वाढले असून काही ठिकाणी पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. आमदार आपल्या मतदारसंघात जाऊन तेथील नुकसानीचा आढावा घेऊन त्यानंतर ती माहिती सभागृहाला अवगत करून देतील. राज्यातील एकूण नुकसानीचा आढावा घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात सर्विस्तर निवेदन करून नुकसानग्रस्तांसाठी मोठी मदत जाहीर करतील अशी माहिती विधानभवनातील सूत्रांनी दिली.

## धर्माबाद तालुक्यात पावसाचा रुद्रावतार; ५३७ मि.मी.ची नोंद

### अनेक गावांना पाण्याने वेढा घातल्यामुळे त्या गावांचा सपंर्क तुटला


आधुनिक केसरी न्यूज

बाबुराव गोणारकर


धर्माबाद : तालुक्यात २६ जुलै पासून वरुणराजाने आपले रुद्ररूप धारण केले असून संपूर्ण तालुका पाणी - पाणी झाला आहे. यामुळे अनेक गावातील बत्तीगुल झाली आहे. तसेच अनेक गावांना पाण्याने वेढा घातल्यामुळे त्या गावांचा सपंर्क तुटला आहे. या नुकसानग्रस्त लोकांना तात्काळ मदत मिळवी तसेच ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होतं आहे.

साधारणत १९८१ च्या नंतर पहिल्यांदाच इतके तुफान पाऊस झाला आहे की, मागील चोवीस तासात ५३७ मिमी, तर सरासरी ३४९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. यामुळे तालुक्यात वाहणारे नदी, नाले, ओहळ ओव्हर फ्लो झाले आहेत. बन्नाळी गावातील एक परिवार पुरात वाहून जात होते मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्यांचे जीव वाचविण्यात यश मिळाले आहेत. पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे,सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव, पोलीस उपनिरीक्षक पंतोजी,जमादार सोमनाथ मठपती, संतोष आणेराय , इंजपवाड, नवीन पाटील,दत्ता काळे, साईनाथ कत्ते, ललेश चपळे यांनी आपले जीव धोक्यात घालून त्यांचे प्राण वाचवले आहे.गावाला चौफेर पाण्याणी वेढा घेतल्यामुळे दरवर्षी प्रमाणे यंदा ही बन्नाळीच्या लोकांना धर्माबाद शहरातील जिल्हा परिषद शाळेत हलविले आहे. येताळारोडवर एक कंटेनर पलटी झाले होते. बिद्राळी - बासर रोडवर पाऊसाचे पाणी जमल्यामुळे प्रवाशांसाठी बंद केले होते. सिरजखोड पूल पाण्यात गेल्यामुळे बामणी,मनूर,संगम,





इळेगावचा संपर्क तुटला आहे. इसापूर कालाव्याच्या अपूर्ण कामाचा फटका रत्नाळी, बाबळी, मंगनाळी, जारीकोट,करखेली परिसरातील शेतीतील माती खरडून जात होतीच पण आता पाणीच अति झाल्यामुळे शेताला शेततळ्याचे रूप आले. चोंडी, चोळाखा, रोशनगाव,पाटोदा ह्या नदी काठाच्या गावांना व शेतीतील पीक पाण्याखाली आले आहेत. आटाळासह विविध गावात बत्तीगुल झाली आहे. पाऊसाच्या रुद्रावतारामुळे सामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या शेतात वं घरात पाणी शिरल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. त्याचा तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

श्यामराव, श्यामलाताई , पिंकी आणि राजेश यांची जंगल सफारी मजेत सुरु होती. पिंकी आणि राजेश तर अतिशय खुश होते. बऱ्याच दिवसांनी आई बाबांबरोबर गाडीतून ते सहलीसाठी जात होते. तेथून जवळच एक प्राचीन हेमाडपंती शिवमंदिर होते. ते मुलांना दाखवावे म्हणून श्यामराव त्यांना तिथे घेऊन जात होते. सगळ्यांची वटवृक्षाखाली खाणं आणि थोडी विश्रांती झाली होती. त्यामुळे सगळ्यांचा मूड फ्रेश होता. गाडीत बाबांनी ' जय जय शिव शंकर ' गाणं लावलं होतं आणि त्या तालावर त्यांचं डोलणं आणि गुणगुणणं सुरु होतं. रस्त्यावर एके ठिकाणी प्राचीन शिवमंदिराकडे असा बोर्ड त्यांना लावलेला आढळला. मुख्य रस्त्याला सोडून गाडी आतमधील छोट्या कच्च्या रस्त्याकडे वळली. थोडेसे अंतर गेल्यानंतर लगेच शिवमंदिर होते. श्यामरावांनी एका लिंबाच्या झाडाच्या दाट सावलीत गाडी पार्क केली. सगळे खाली उतरले. तिथे एका बाजूला काही माणसे फुले, हार, बेलपत्रे आदी विक्रीसाठी घेऊन बसली होती. शामलाताईंनी एका बाईजवळून बिल्वपत्रे विकत घेतली. दुरूनच शिवमंदिराची दगडी हेमाडपंती बांधणी लक्ष वेधून घेत होती. राजेशच्या मनात नेहमीप्रमाणेच काही प्रश्नांनी गर्दी केली होती. पण बाबा म्हणाले, ' बेटा, आपण आधी भोलेनाथांचं दर्शन घेऊ. मंदिरात दर्शन घेताना काही बोलू नये. मग निवांतपणे तू काहीही विचार. ' राजेश म्हणाला, ' हो, बाबा. ' गाभाऱ्याच्या बाहेर एक सुंदर दगडी नंदी होता. सगळ्यांनी आधी त्याला नमस्कार केला. मंदिरात गेल्यानंतर श्यामलाताईंनी आपल्याजवळील बेल काहीतरी मंत्र म्हणत भगवान शंकराच्या पिंडीवर अर्पण केला. श्यामराव, राजेश, पिंकी यांनीही काही बेलाची पाने पिंडीवर वाहिली. बाहेरचा दगडी सभामंडप खूपच छान होता. तेथील खांबांवर आणि बाजूच्या कमानीवर छानपैकी नक्षी, पौराणिक चित्रे आणि आकृत्या कोरलेल्या होत्या. आजूबाजूला असलेला उन्हाचा ताप तिथे जाणवत नव्हता. काही क्षण तिथे बसल्यानंतर सगळे बाहेर पडले. आता मंदिराच्या भोवतालचा परिसर ते न्याहाळत होते. राजेश म्हणाला, ' बाबा, तुम्ही मघापासून हे मंदिर हेमाडपंथी आहे असं म्हणत होता. हेमाडपंथी म्हणजे काय ?' बाबा म्हणाले, ' अरे बाबा, हेमाडपंथी नाही, हेमाडपंती. बरेच लोक हेमाडपंथी असा चुकीचा उच्चार करतात.



## समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## विसंवादाने वैरभाव वाढतो

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या अनुकरणप्रिय मनाला काहीवेळा आपल्या गतकाळातील अर्थात भूतकाळातील अनुभवांचं अंधानुकरण करावं असं वाटत असतं. आपण पूर्वी असं केलं, तेव्हा तसं झालं होतं अशाप्रकारच्या यशप्राप्ती मिळालेल्या गतअनुभवाची पुनरावृत्ती व्हावी अशी आपली भ्रामक कल्पना असते. आपण असा अनेकदा विचार करतो. इतका आपल्या गतकाळातील अनुभवांवर भरवसा असतो. पुन्हःश्च तसंच होईल अशी आपल्याला कोणत्यातरी कारणाने खात्री वाटत असते. प्रत्येकवेळी नव्यानं विचार करून निर्णय घेण्याचा, कृती आणि व्यवहार करण्याचा, आपल्या विवेकी बुद्धीला नेमका विसर पडलेला असतो. एखादेवेळी कदाचित एखादी घटना, घडामोड,

गोष्ट पूर्वीप्रमाणेच घडेल, असा अंधविश्वास आपण अनेकदा ठेवतो. शिवाय नेहेमीच तशी घडेल हे कोणत्या ना कोणत्या कारणानं आपण गृहीत धरत असतो. आपल्या आयुष्यांत येणारा प्रत्येक क्षण नवा असतो. येणारा प्रत्येक नवा क्षण आपल्यासाठी नवीन आव्हानं, आनंद घेऊन येत असतो. ही आव्हानं स्वीकारण्यासाठी कायमस्वरूपी बनवून ठेवलेला रबरी शिक्का वापरून चालत नाही, ह्याची जाणीव होणं आवश्यक असतं. विशेषतः व्यक्तींचा परस्परांमध्ये झालेला विसंवाद, मतभेद ह्यामुळे निर्माण झालेला गैरसमज आणि कालांतरानं दुरावा, ह्यांत देखील गतकाळातील अनुभवांमुळे, काही काळ-वर्ष बदल होत नाहीत. केवळ गतकाळातील घडलेला एखादा प्रसंग त्यापुढील काळात आपापसातील संबंध बिघडायला कारणीभूत ठरल्याचं अनकेदा दिसून येतं. आपण परस्परांतील नातेसंबंधात देखील अनेकदा गतकाळातील संवाद, घटना, घडामोडी, विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांचा सरधोपटपणे संबंध वर्तमानातील गोष्टीशी जोडत राहतो. त्यांतील नकारात्मकता ही व्यक्तिगत संबंध बिघडायला अथवा काहीवेळा संपुष्टात यायला कारणीभूत ठरते. झालं गेलं विसरून जावं पुढे पुढे चालावं हे जीवनगाणे गातच राहावं लागतं, हे आपण समजून घेत नाही.



आधुनिक केसरी

## मौनची उत्तर | श्रेष्ठ मार्ग ||

संसाराची दुःखे | अटळ जाणावे ||
प्रारब्ध भोगावे | याच जन्मी ||
टाळूनी टळेना | नशिबाचा फेरा ||
चिंतेचा पसारा | जीव घेई ||१||
सत्कर्माचे अंगी | सुखाचा सुगंध ||
विकारी जो अंध | कैसा जाणे ||३||
ईश्वरनिष्ठांचा | असावा शेजार ||
परमार्थे घर | उजळते ||४||
सात्विक भावाने | करावा संसार ||
मौनची उत्तर | श्रेष्ठ मार्ग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

धान्यं च मे धनं देहि दधिं दुग्धं घृतं तथा |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम् || ५२ ||

मला धान्य दे. धन दे. दूध, दही तसेच तूप दे. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

ज्ञान तो जीवन चक्षु है, ज्ञान पंथ परकाश ।
ज्ञान तो योग अधार है, ज्ञान बिना सब नाश
।।२३।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल चतुर्थ अध्याय)

०४/०४/२३ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ज्ञानाद्वारेच जीवनातील सर्व कर्तव्यपथ दृष्टिगोचर होत जातात आणि प्राणी ( मनुष्य) पुढे जीवनाचा विकास करत जातो. ज्ञान हाच मार्गाचा प्रकाश आहे आणि ज्ञानच योगाचा आधार आहे. ज्ञानाशिवाय सर्व कर्तव्य-पथ अंधारात राहातात, ज्यामुळे मनुष्य जीवन नष्ट होउन जातं. ज्ञानच जीवनाच्या उन्नतीचं साधन आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## मोक्षलक्षण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


मित्रांनो आपल्याला मनुष्य जन्म मिळाला आहे. षडरिपू आपल्याला माहिती आहेत. यावर मात करत आपल्याला जन्ममरणाच्या यातायातीतून कायमची सुटका करून घ्यायची तर आहे.!!! यावर आपल्याला मार्गदर्शन किंवा वाटाड्या कोणी तरी लागतोचं ना! तो कुणी तरी म्हणजेच अहो ।।।आपलेच सद्गुरू मोक्ष मिळवायचा आहे ना ? तर सद्गुरु नी सांगितलेल्या वाटेवरून चालत रहा एक दिवस भगवंत आपल्याला मोक्षाच्या वाटेवर नेऊन ठेवल्या शिवाय रहाणार नाही. यावर विश्वास ठेवा. बंध जीवाला मुक्त करण्याचं काम संत करतात. मी पणा हा फार मोठा दुर्गुण बध्द जीवाला येतो. या बध्दपणाला बाजूला सारून आत्मानात्मविवेक शिकवून सर्व बंधनातून मोकळं करायचं काम दासबोधा सारखा ग्रंथ करतो. म्हणून सतत सत्समागमात रहावे. पापपुण्य,केलेल्या वाईट कर्माचे फळ भोगल्या वाचून सुटका नाही. हे ज्याला कळंतं तो संतांचा आधर घेतो.

बध्द म्हणजे काय- मी जीव आहे या भावनेने बांधलेल्या जीवास बध्द म्हणतात. रेशमाचा किडा स्वतः च रेशमाचा कोष निर्माण करतो. त्यात अडकून गुदमरून मरण पावतो. त्याच प्रमाणे जीव आपणचं संकल्प करतो आणि तो घट्ट झाला की त्याच्याशी एकरूप होतो जन्ममरणाच्या फे-र्यात अडकून पडतो.

## भगवंताचे नाम सोडू नका

आधुनिक केसरी

संकल्प ही फार मोठी शक्ति आहे. इच्छा जर खरोखर अती प्रबळ झली, तर ती वस्तूला आपल्याकडे खेचून घेतल्याशिवाय राहणार नाही. तसेच, भगवंताच्या प्राप्तीसाठी प्रबळ इच्छा धारण केली तर भगवंत भेटतो. प्रापंचिक वस्तू आपण कितीही मिळविल्या, तरी त्या स्वभावतःच अपूर्ण असल्यामुळे त्यांच्या प्राप्तीपासून पूर्ण समाधान होत नाही. याच्या उलट, भगवंत स्वतः पूर्ण असल्यामुळे, आपल्या वासनांची पूर्ण तृप्ती होऊन त्या क्षीण बनतात, आणि नंतर आपोआप नाहीशा होतात. म्हणून नेहमी 'भगवंत मला हवा' अशी इच्छा करीत जावे. त्याचे नाम घेणे, म्हणजे 'तू मला हवास' असे म्हणणेच होय. खऱ्या प्रेमाने जर आपण आपला भार रामावर टाकला, तर तो नेहमी आपल्या कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडवून आणतो. आपला देह आणि प्रपंच भगवंताच्या सत्तेने चालतो, ही जाणीव सतत ठेवून जगात वागावे, म्हणजे आपल्याला कधी कमी पडणार नाही.



नामात एक विशेष आहे. विषयाकरता जरी नाम घेतले तरी विषय प्राप्त होऊनही ते आपले काम, म्हणजे तुमचे मन निर्विषय करणे, ते करीतच असते, म्हणून कशाकरता का होईना, नाम घ्या. पण निर्विषय होण्याकरिता घेतले तर काम शीघ्र होईल. साधन तेच, आणि साध्यही तेच. नामच एक सत्य आहे, यापरते दुसरे सत्य नाही, यापरते दुसरे साधन नाही, असा दृढ भाव असावा. आपण कोणचेही कृत्य करीत असताना, ज्याकरता ते आरंभले ते जसे नेहमी आपल्या डोळ्यासमोर असते, नाम घेताना, ते आपण कशाकरता घेतो त्याची जाणीव अखंड असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान. वास्तविक आपण भगवंताचेच आहोत, पण भ्रमाने मला 'मी विषयाचा आहे' असे वाटू लागले. संत 'तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस,' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी; आणि याकरता ते नाम सांगतात, नाम घेणे म्हणजे 'मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे' असे मनाला सांगणे, मनात तशी जाणीव उत्पन्न करणे, आणि ही जाणीव टिकवण्याकरता पुनः पुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे.

भगवंत खरोखरच मनापासून ज्याला हवा आहे, त्याचे काम झालेच पाहिजे. आपल्याला जगातला मान, लौकिक, पैसा, विषय इत्यादि काही नको असे वाटते का ? तसे नसेल तर, 'भगवंत मला हवा आहे' असे नुसते तोंडाने म्हणणे बरोबर नाही. ज्याला भगवंताचे प्रेम जोडायचे असेल त्याने जगाचा नाद सोडायला पाहिजे. जगाच्या मागे लागाल तर आपले साधन बुडवून बसाल. तुम्ही सतत भगवंताचे नाम घावे आणि मनापासून भगवंताला आळवावे, तुम्ही कितीही पतित असला तरी पावन होऊन जाल, हा माझा तुम्हाला आशीर्वाद आहे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात राहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा. शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी भगवंत रूप झाली तो खरा गुरू, आणी जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. कोणाचा अनुग्रह घ्यावा हा प्रश्न असल्यास इथे सुद्धा डोळे झाकून कोणाच्याही मागे जाऊ नये .जसे कि स्वामी विवेकानंद म्हणतात कि परमेश्वराने प्रत्येकालाच हात,पाय,डोके,बुद्धी,ई क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः ।नास्त्युद्यमसमो बन्धुः कुर्वाणो नावसीदति ॥

स्पष्टीकरण – शत्रू बाहेर असतात असे नाही. ते माणसाच्या शरीरात आणि मनातही असतात. आळस हा त्यातला मोठा शत्रू होय. 'मला कंटाळा आला आहे' हे आळसाचे मुख्य लक्षण. आळशी माणूस जाग्यावरून हालायलाच तयार नसतो. मग त्याची कामे कशी होणार ! आळसामुळे उत्साह नष्ट होतो. उत्साह गेला की उद्योगातली उभारीच जाते. त्यामुळे उत्कर्षाला खीळ बसते. यासाठी सगळयाच्या आधी आळस झाडून टाकला पाहिजे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २८ जुलै २०२३



किशोरवयीन मुलीस आईचे पत्र
पान ६



संतांच्या मते शाश्वत सुख कोणते ?
पान ७

# भोकर तालुक्यात धुवाधार

## नदीनाले पुराने तुडुंब : अनेक गावांत शिरले पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात मागील दोन दिवसांपासून धुव्वाधार पाऊस कोसळत असल्याने जनजीवन विस्कळित झाले आहे. तेलगंणातील "सूधावागू" प्रकल्पाच्या बॅकवाटरनी सिमेलगतच्या भागात जळस्थळी पाणीच पाणी झाल्याने ग्रामस्थ हैराण झाले आहेत.शेतीला अक्षरशा तळ्याचे स्वरूप प्राप्त झाल्याने पिकाची खरडपट्टी झाली आहे. तालूक्यात ओलादूष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.


पावसाळ्याच्या प्रारंभी वरूणराजाने दडी मारल्याने बळीराजा हवालदिल झाला होता. पावसाळ्याच्या मध्यान पावसाने अक्षरशा हैदोस घातल्याने खरिपपिकाचे नूकसान झाले आहे. मागील दोन दिवसांपासून तालुक्यात पाऊस काहिकेल्या ऊसंत घ्यायला तयार नाही. परिणामी जनजीवन विस्कळित झाले आहे. तेलगंणातील सुधावागु प्रकल्पातील बॅक वाटरनी सिमेलगत असलेल्या महागाव, दिवशी, रावणगाव, लगळुद, मातूळ, नांदा गावात पाणी शिरल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. नदीनाले दूथडी भरून वाहत असल्याने रायखोड, डौर, हस्सापूर परिसरात शेतीला अक्षरशा तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले असून खरिप पिकाची खरडपट्टी झाली आहे. तालूक्यात पाऊस सैराट झाल्याने दाणादाण उडाली आहे. शासनाने त्वरित नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून ओला दूष्काष्ळ जाहीर करावा व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



तेलगंणातील म्हैसा येथील सुधावागु प्रकल्पातील बॅकवाटरनी सिमेलगत असलेल्या लगळुद, रावणगावचा काही काळ संपर्क तूटला होता . गावात पाणी शिरल्याने ग्रामस्थांच्या मदतीला महसूल पथक पाठवण्यात आले आहे . तेलगंणातील प्रशासनाला जिल्हाधिकारी यांनी संपर्क साधून प्रकल्पाचे पाच दरवाजे उघडण्याचे सुचवल्याने हळूहळू पाणी ओसरत आहे . तालूक्यात नूकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी दौरा सुरू आहे .सविस्तर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नूकसानीचा आकडा स्पष्ट होईल .तालूक्यात सूदैवाने कुठेही जिवीतहानी झाली नाही . प्रशासन दक्ष असुन आवश्यक सेवा देण्यासाठी आम्ही कुठे हि कमी पडणार नाही .शासनाला सहकार्य करावे . ( **राजेश लांडगे, तहसीलदार भोकर** )

# ईडीचे संचालक संजय मिश्रा यांना मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली:** केंद्र सरकारने मागणी केल्याप्रमाणे आता ईडीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. संजय मिश्रा यांना ईडीचे संचालक म्हणून 15 सप्टेंबरपर्यंत मुदतावाढ देण्यात आली आहे. मिश्रा हे फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सच्या पुनर्रचनेच्या प्रकियेत सहभागी असल्याने राष्ट्रीय हितासाठी त्यांना 15 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी केंद्र सरकारने न्यायालयाकडे केली होती. एसके मिश्रा यांचा ईडी संचालक म्हणून कार्यकाळ 31 जुलै रोजी संपणार आहे.

संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ वाढवू नये असे आदेश सुप्रीम कोर्टाने 2021 मध्येच दिली होते. त्यानंतर देखील नवीन तरतूद करत त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाने त्यांच्या मुदतवाढीला आक्षेप घेतला होता. संजय मिश्रा यांचा ईडीचे संचालक म्हणून 31 जुलैपर्यंत कार्यकाल होता. त्यादरम्यान केंद्र सरकारने नवीन ईडी संचालकांची निवड करावी असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते. तसेच त्यांचा कार्यकाळ वाढवणे हे बेकायदेशीर असल्याचे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते. त्यानंतर देखील आठवडा बाकी असताना केंद्राने पुन्हा सुप्रीम कोर्टात संजय मिश्रा यांना मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी केली होती. मिश्रा हे ईडीचे संचालक म्हणून 2018 साली नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा कार्यकाळ हा 2020 मध्ये समाप्त होणार होता. मात्र, केंद्र सरकारने त्यांना एक वर्षाची सेवा मुदत वाढ दिली. स्वयंसेवी संस्था 'कॉमन कॉज'ने सुप्रीम कोर्टात या मुदतवाढीला आव्हान दिले होते. 8 सप्टेंबर 2021 मध्ये सुप्रीम कोर्टाने म्हटले होते की, मिश्रा यांचा विस्तारीत कार्यकाळ 18 नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्यामुळे आता दखल दिली जाणार नाही. मात्र, त्यांचा कार्यकाळ या पुढे वाढवण्यात येऊ नये असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते.मिश्रा यांना 19 नोव्हेंबर 2018 मध्ये दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली होती.

# पुण्यात मुलास कबुतराची विष्ठा खायला लावण्याचा प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ढाबळीतील कबुतर घेतल्याच्या वादातून सराईत गुन्हेगाराने साथीदारांच्या मदतीने एका १२ वर्षाच्या मुलाचे अपहरण करुन त्याला कबुतराची विष्टा खायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कात्रजमधील संतोषीमाता मंदिराच्या मागील बाजूला हा प्रकार घडला.

या बाबत कात्रजमधील संतोषनगर येथील एका अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सराईत गुन्हेगार अमोल आडम याच्यासह चौघांवर गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना कात्रजमधील संतोषीमाता मंदिराच्या मागील बाजूस मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजता घडली. त्यातील दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी कबुतरे पाळली होती. त्यातील एक कबुतर फिर्यादीच्या १२ वर्षाच्या मुलाने आणले होते. त्यावरुन अमोल आडम हा त्याच्या तीन साथीदारांसह संतोषनगरमध्ये आला. त्यांनी हवेत हत्यारे फिरवून कोणी जर मध्ये आले, तर एका एकाला तोडून टाकीन, असे म्हणून दहशत निर्माण केली. फिर्यादी यांच्या बारा वर्षाच्या मुलाला हाताने मारहाण आणि शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्याला दुचाकीवर बसवून कात्रज येथील साई अपार्टमेंट येथे नेले. तेथे त्याला कबुतराची विष्टा खायला लावली. त्यानंतर 'पोलिसांना आमचे घर दाखविले तर तुला जिवंत ठेवणार नाही', अशी धमकी देऊन त्याला साई मंदिराजवळ सोडून दिले. त्यानंतर त्याने हा प्रकार वडिलांना सांगितला. पोलिसांनी चौघांवर गुन्हा दाखल केला असून दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. सहायक पोलीस निरीक्षक वर्षा तावडे तपास करीत आहेत.

# गुन्हेगाराची धिंड नव्हे,भरचौकात फाशी दिली पाहिजे

## गृहमंत्री देवेंद्र फडणवीस : सावित्रीबाई फुले प्रकरणी विरोधक आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्या वेबसाईटवर बंदी घालावी, अशी मागणी करत विरोधकांनी आज सरकारला धारेवर धरले होते. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर उत्तर देताना, गुन्हेगाराची धिंड नव्हे तर भर चौकात त्याला फाशी दिली पाहिजे अशा मताचे आम्ही आहोत असे सांगितले. मात्र, यात कायद्याने कारवाई करावी लागेल. ज्या वेबसाईटने वृत्त दिले, त्याच्यावर कारवाई केली आहे.

एकीकडे सत्य बोलणारे राहुल गांधी यांच्यावर दोन वर्षाची बंदी घातली जाते. दुसरीकडे महापुरुषांबाबत लिखाण करणारे राज्यात मोकाट फिरतात. हा कसला न्याय ? असा विरोधकांनी सरकारला विधानसभेत सवाल केला. यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. प्रचंड गदारोळ झाला आणि सत्ताधाऱ्यांचा निषेध करत विरोधकांनी सभात्याग केला.

राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला. सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल एका वेबसाईटने आक्षेपार्ह लेख लिहून त्यांची बदनामी केली. मोठ्या राजकारण्यांबद्दल कुणी काही लिहीले तर चोवीस तासाच्या आत सायबर पोलीस ॲक्टिव्ह होतात. आकाश पाताळ एक करून त्यांना उचलून आणतात. परंतु, सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल इतके आक्षेपार्ह लिहिणारा त्यांना सापडत नाही ? असा सवाल आव्हाड यांनी करून हे आरोपी कधी पकडणार हे सरकारने सांगावे, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबाबत ज्यांनी विकृत लेखन केले त्या गुन्हेगाराच्या मुसक्या आवळून त्यांची धिंड काढून रस्त्यावरून फिरवले पाहिजे. पण, सरकार त्यावर कारवाई करण्याऐवजी दिशाभूल करणारी माहिती देत आहेत अशी टीका केली. एकीकडे 'सत्य बोलणाऱ्या राहुल गांधी यांना बोलण्यापासून रोखण्यासाठी दोन वर्षांची शिक्षा केली जाते. दुसरीकडे महापुरुषांबाबत लिखाण करणारे, विकृत गुन्हेगार मोकाट फिरतात. हा कसला न्याय ? असा थेट सवाल त्यांनी केला. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, यासंदर्भात ट्विटरला तीन पत्र लिहिले असून त्याची माहिती मागविली आहे. पोलीस सातत्याने ट्विटरच्या संपर्कात आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले किंवा इतर कोणत्याही महापुरुषांबद्दल चुकीचे लिखाण करणाऱ्याला पाठिशी घालणार नाही, त्यांच्यावर कठोर कारवाई करणार, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यांच्या उत्तरावर विरोधकांनी हरकत घेत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. सरकारची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप केला. यामुळे सत्ताधारी विरोधक यांच्यात खडाजंगी झाली. दोन्ही बाजूंनी घोषणाबाजी झाल्या. अखेर सरकारच्या निषेधार्थ विरोधकांनी घोषणा देत सभात्याग केला.

# गढूळ पाण्यासाठी थेट धोकादायक नदीपात्रात उतरतात महिला

आधुनिक केसरी न्यूज

**धनंजय साखरकर**

**चंद्रपूर :** नदी पात्र दुथळी भरून वाहत असताना थेट नदी पात्रात उतरून पिण्याचे पाणी आणण्याची दुदैवी वेळ चंद्रपूर जिल्हातील टोक या गावावरओढवली आहे. जरा तोल गेला की थेट नदी पात्रात जाण्याचा धोका कायम असतो. मात्र करायचं काय ? हा प्रश्न गावकरी विचारत आहेत.ही विदारक स्थिती अद्यापही प्रशासनाला दिसू नये, हीच खरी शोकांतिका आहे.

चंद्रपूर जिल्हातील पोंभूर्णा तालुक्याचा शेवटचा टोकावर असलेलं लहानसे गाव टोक.गावात जेमतेम 30 कुटुंब. लोकसंख्या 200.सर्व कुटुंब केवट समाजाचे आहेत. मोजकी शेतजमीन आणि मासेमारी हा गावाकऱ्यांचा मुख्य व्यवसाय. गावात अनेक समस्या उभ्या आहेत. या समस्या सोडवण्याकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष झाले. गावाची मुख्य समस्या आहे. पिण्याचा पाण्याची गावापासून दोन की. मी. अंतरावर असलेल्या वैनगंगा नदी पात्रातील पाणी आणावे लागत होते. ही समस्या लक्षात ग्रामपंचायत सदस्य वैभव पिंपळशेंडे यांनी हा प्रश्न लावून धरला.सहा महिन्यापूर्वी जल जीवन मिशन योजने अंतर्गत सोलर ड्युअल पम्प बसाविण्यात आले. मात्र या विहिरीचे पाणी क्षारयुक्त असल्याने पाण्याचा वापर पिण्यासाठी होत नाही. अश्यात धो धो वाहणाऱ्या नदी पात्रातून पिण्याचे पाणी त्यांना आणावे लागते. सध्या नदीला गढूळ पाणी आहे. या गढूळ पाण्यासाठी ही गावाकऱ्यांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे.




## लाल डायरी

आधुनिक केसरी

देशाच्या राजकारणात सध्या 'लाल डायरी'चा मुद्दा चर्चेचा विषय ठरला आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या कथित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा त्यात उल्लेख असल्याचा दावा भाजपाकडून केला जात आहे. या डायरीवरून राजस्थानमध्ये अशोक गेहलोत यांना लक्ष्य केले जात असताना त्यावरून मोदींनी आज राजस्थान दौऱ्यादरम्यानही गेहलोत यांच्यावर टीका केली. यावरून आता अशोक गेहलोत यांनी पंतप्रधान मोदींना प्रत्युत्तर दिले आहे. अवघ्या तीन महिन्यांवर राजस्थानच्या विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्यातले राजकीय वातावरण तापू लागले आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गुरुवारी राजस्थानमधील काही विकासकामांचे उद्घाटन केले. यानंतर राजस्थानच्या सिकरमधील सभेत बोलताना मोदींनी अशोक गेहलोत यांच्यावर टीकास्त्र सोडले. काँग्रेस म्हणजे लूट की दुकान, झूठ का बाजार. या लूट की दुकानचंच उत्पादन म्हणजे लाल डायरी आहे, असा टोला मोदींनी अशोक गेहलोत यांना लगावला. राजस्थान काँग्रेसमध्ये अनेक बडे नेतेही लाल डायरीचा उल्लेख करताच मौन होत आहेत. हे लोक अशा नेत्यांच्या तोंडाला कुलूप लावू शकतात. पण या निवडणुकांमध्ये राजस्थानमधील जनता संपूर्ण काँग्रेसचा डब्बा गोल करणार आहे, असेही मोदी यावेळी म्हणाले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या टीकेला अशोक गेहलोत यांनी प्रत्युत्तर दिले आहे. पंतप्रधानांनी सिकरमध्ये बोलताना भाषण दिले. एका लाल डायरीवर ते बोलले. पंतप्रधानपदाचे एक महत्त्व आहे. त्यांच्याकडे इन्कम टॅक्स आहे, ईडी आहे, सीबीआय आहे. याचा दुरुपयोग त्यांच्याकडून होत आहे. त्यांना या डायरीविषयी माहिती काढता येत नाही का? हे डायरी प्रकरण त्यांनी जाणून बुजून काढले आहे, असे अशोक गेहलोत माध्यमांना म्हणाले. विधिमंडळात ५० डायऱ्या आणल्या गेल्या. मी तर ऐकले की संसदेतही डायऱ्या लावल्या गेल्या. मोदींचा पक्ष एवढा घाबरलाय की ते वारंवार इथे येतायत? तसं तर राजकारणात त्यांनी यावे. मग ते राजनाथ सिंह असो किंवा अमित शाह असोत. पण राजस्थानवर टीका गेली की महिलांवर अत्याचार हो आहेत, कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, भ्रष्टाचार होतोय वगैरे. एसीबीचे सर्वाधिक छापे राजस्थानमध्ये पडले आहेत. त्यानंतरही हे लोक राजस्थानला लक्ष्य करत आहेत. तीन महिन्यांत निवडणुका होणार आहेत. पण जनतेतले वातावरण पाहून हे इतके घाबरले आहेत की देशाचे पंतप्रधान लाल डायऱ्या दाखवून काहीही आरोप लावत आहेत, अशा शब्दांत अशोक गेहलोत यांनी मोदींना लक्ष्य केले. दरम्यान, गुरुवारी सकाळपासूनच मोदींच्या कार्यक्रमातून अशोक गेहलोत यांचे भाषण काढल्याच्या मुद्द्यावरून राजकीय दावे-प्रतिदावे चालू होते. आधी अशोक गेहलोत यांनी ट्वीट करून आपले भाषण कार्यक्रम पत्रिकेतून हटवल्याचा दावा केला. त्यावर पंतप्रधान कार्यालयाने असे काहीही नसून आपली उपस्थिती महत्त्वाची आहे, असे ट्वीट केले. त्यावर पुन्हा अशोक गेहलोत यांनी कार्यक्रम नियोजन पत्रिकेचे फोटो शेअर करत त्यातून आधी असणारे त्यांचे तीन मिनिटांचे भाषण नंतर काढल्याचा दावा केला आहे.

## विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव का आणला ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**मणिपूर हिंसाचार प्रकरणाबाबत विरोधकांनी सरकारविरोधात रस्त्यापासून संसदेपर्यंत मोर्चा उघडला आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होऊन सहा दिवस झाले असून, सभागृहाच्या कामकाजात दररोज गदारोळ होत आहे. बुधवारी काँग्रेस आणि बीआरएसच्या वतीने मोदी सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडण्यात आला. काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी लोकसभेत महासचिवांच्या कार्यालयात अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली आहे. याशिवाय तेलंगणातील सत्ताधारी पक्ष बीआरएसनेही वेगळा अविश्वास प्रस्ताव आणला आहे. संसदेतील संख्याबळ पाहता मोदी सरकार सध्या मजबूत स्थितीत असल्याचे दिसते. असे असतानाही विरोधकांनी अविश्वास ठराव आणला आहे. संसदेत संख्याबळ नसतानाही विरोधकांकडून हा अविश्वास प्रस्ताव का आणला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचे राजकीय महत्त्व काय?**

प्रथम संसदेत विरोधी पक्ष आणि सरकारच्या समर्थनार्थ खासदारांची संख्या समजून घेवू या..

भाजपच्या नेतृत्वाखालील एन डी ए सरकारला सध्या लोकसभेत ,३३९ हून अधिक खासदारांचा पाठिंबा आहे. एकट्या भाजपचे ३०१ खासदार आहेत. त्याच वेळी, विरोधी कॅम्प म्हणजेच इंडिया अलायन्सचे लोकसभेत १४२ आणि राज्यसभेत ९६ खासदार आहेत. संख्याबळाचा विचार करता दोन्ही सभागृहात सत्ताधारी पक्ष बलाढ्य आहे.

**प्रश्न निर्माण होतो तर विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव का आणला ?**

विरोधकांना अजूनही कोणत्याही स्थितीत चर्चेच्या केंद्रस्थानी राहायचे आहे. सरकारवर वर्चस्व गाजवण्याची एकही संधी विरोधकांना द्यायची नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरच्या मुद्द्यावर सभागृहात विधान करावे, अशी मागणी विरोधक सातत्याने करत आहेत. त्याचबरोबर गृहमंत्री अमित शाह या मुद्द्यावर निवेदन देतील, असे सरकारने म्हटले आहे. अशा परिस्थितीत अविश्वास प्रस्ताव हा असाच एक मार्ग आहे ज्याद्वारे विरोधक पंतप्रधान मोदींना संसदेत बोलावण्याचा प्रयत्न करत आहेत. एकंदरीत सर्व विरोधी पक्षांना फक्त पंतप्रधान मोदींना घेरायचे आहे.

सध्या संपूर्ण एनडीएचा एकच चेहरा आहे आणि तो म्हणजे पंतप्रधान मोदी. अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदींनी कोणत्याही प्रकारे अशा वादात अडकू नये, अशी भाजपची इच्छा आहे. त्यामुळेच सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच पंतप्रधान मोदींनी मीडियासमोर मणिपूर घटनेचा निषेध केला आणि कठोर कारवाईबाबतही बोलले.

**अविश्वास प्रस्ताव कसा आणला जातो ?**

सभागृहात अविश्वास प्रस्ताव आणण्याचाही नियम आहे. नियम १९८ अंतर्गत लोकसभेत मांडण्यात आले आहे. संसदेत हा अविश्वास प्रस्ताव मांडण्यासाठी सुमारे ५९ खासदारांची गरज आहे. संसदेत अविश्वास प्रस्तावावरील मतदानादरम्यान ५१ टक्क्यांहून अधिक खासदारांनी त्याच्या बाजूने मतदान केले तर सरकार अडचणीत येते. अशा स्थितीत सरकारला आपले बहुमत सिद्ध करावे लागेल.

**विरोधी पक्ष काय म्हणाले ?**

काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी म्हणाले,




'पंतप्रधान मोदी मणिपूरवर सभागृहाबाहेर बोलतात, पण सभागृहात बोलत नाहीत. मणिपूरकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा विरोधकांनी वारंवार प्रयत्न केला, पण तो अपयशी ठरला आहे. अशा स्थितीत अविश्वास प्रस्ताव हीच योग्य गोष्ट आहे.

आरजेडीचे खासदार मनोज झा म्हणाले की संख्याबळ हे आपल्या पक्षात नाही हे आम्हाला माहीत आहे पण लोकशाही म्हणजे फक्त संख्याबळ नाही. मणिपूर जळत आहे आणि लोक पंतप्रधान बोलण्याची वाट पाहत आहेत...कदाचित अविश्वास प्रस्तावाच्या बहाण्याने त्यांना काही बोलण्यास भाग पाडले जाऊ शकते. ही सर्वात मोठी उपलब्धी असेल.

शिवसेना ( उबाठा )खासदार प्रियांका चतुर्वेदी म्हणाल्या की कोणी आपली जबाबदारी टाळत आहे, कोणी मणिपूरबद्दलची जबाबदारी पार पाडत नाही. पंतप्रधान संसदेत का येत नाहीत, असा प्रश्न लोकांना पडतो जर पंतप्रधानांना संसदेत आणण्यासाठी हा अविश्वास प्रस्ताव वापरावा लागला तर मला वाटते की आपण या देशाची खूप मोठी सेवा करत आहोत.

सीपीआयचे खासदार बिनॉय विश्वम म्हणाले की, हा अविश्वास ठराव राजकीय हेतूने केलेली राजकीय खेळी आहे. एक राजकीय खेळी जे परिणाम देईल... अविश्वास प्रस्ताव त्यांना ( पंतप्रधान ) संसदेत येण्यास भाग पाडेल. देशाच्या विशेषतः मणिपूरच्या प्रश्नांवर संसदेच्या आत चर्चा करणे आवश्यक आहे. नंबर विसरा, त्यांना नंबर माहित आहेत आणि आम्हाला देखील नंबर माहित आहेत.

भारत राष्ट्र समितीचे ( BRS ) खासदार नामा नागेश्वर राव म्हणाले की, आम्ही आमच्या पक्षाच्या वतीने अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. अधिवेशनाच्या सुरुवातीपासूनच सर्व विरोधी पक्षनेते मणिपूरच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी करत आहेत. यावर पंतप्रधान बोलले तर देशातील लोकांमध्ये शांतता नांदेल - यासाठीच आम्ही प्रयत्न केले... म्हणूनच आज हा ठराव आणला आहे.


प्रसारमाध्यमांशी बोलताना लोकसभेतील काँग्रेसचे व्हिप मणिकम टागोर म्हणाले की, विरोधी पक्षांच्या युती असलेल्या भारताची ही कल्पना आहे. ते म्हणाले की, सरकारचा अहंकार मोडून काढण्यासाठी ( अविश्वास प्रस्तावाची सूचना ) हे शेवटचे हत्यार म्हणून वापरले पाहिजे आणि मणिपूरच्या मुद्द्यावर बोलण्यास भाग पाडले पाहिजे, असे ते म्हणाले.

**सरकारकडून काय म्हटले होते ?**

सरकारच्या वतीने संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले की, लोकांचा पंतप्रधान मोदी आणि भाजपवर विश्वास आहे. गेल्या टर्ममध्येही त्यांनी ( विरोधक ) अविश्वास ठराव आणला होता. या देशातील जनतेने त्यांना ( विरोधकांना ) धडा शिकवला आहे.

केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले, 'अविश्वास प्रस्ताव येऊ द्या, सरकार प्रत्येक परिस्थितीसाठी तयार आहे. आम्हाला मणिपूरवर चर्चा हवी आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी त्यांना चर्चा हवी होती. आम्ही मान्य केल्यावर त्यांनी नियमांचा मुद्दा उपस्थित केला. आम्ही नियमांवर एकमत झाल्यावर पंतप्रधानांनी येऊन चर्चा सुरू करावी, असा नवा मुद्दा त्यांनी मांडला. मला वाटते की हे सर्व बहाणे आहेत. देशात आतापर्यंत २७ अविश्वास प्रस्ताव आणण्यात आले आहेत. भारताच्या इतिहासात आतापर्यंत २७ अविश्वास प्रस्ताव आणले गेले आहेत. मोदी सरकारविरोधात शेवटचा अविश्वास प्रस्ताव जुलै २०१८ मध्ये आला होता. हा प्रस्ताव सपशेल अपयशी ठरला. एनडीएला ३२५ तर विरोधकांच्या प्रस्तावाला १२६मते मिळाली. देशातील पहिला अविश्वास प्रस्ताव १९६३ मध्ये पंडित नेहरूंच्या विरोधात आणण्यात आला होता. काँग्रेस नेते आचार्य कृपलानी यांनी हा प्रस्ताव आणला आणि तो पराभूत झाला. इंदिरा गांधींच्या विरोधात १५वेळा अविश्वास प्रस्ताव आणला गेला आणि प्रत्येक वेळी त्यांचे सरकार वाचवण्यात त्या यशस्वी झाल्या.

## आयआयटी एक गारूड



अमोल काटे
पिंपळे सौदागर, पुणे

आधुनिक केसरी

**आपल्यावेळी आपण परीक्षा दिली की, प्लॅन करायचो ते कोणते खेळ खेळायचे आणि किती वेळ खेळायचे. कुठे गावाला जायचे. त्यात कुठेही पुढचा अभ्यास, ११वी,१२वी असा फारसा कोणताही विचार नसायचा. आता परिस्थिती किती बदलली ना!! ९,१०वी झाली की, क्लासेस चे फोन सुरू होतात. किंवा बरेच जण "आयआयटी फाउंडेशन" ह्या गोंडस नावाखाली चालणाऱ्या गारुडाला भुलून मुलांना त्या गर्तेत ढकलतात. इथे एक सांगावे लागेल, की आयआयटी च्या क्लासेस ला माझा विरोध नाही. पण सगळ्यांनीच आयआयटी ची तयारी करणे कितपत योग्य आहे? खरंच त्यासाठी तुमची तुमचा पाल्याची, पूर्ण मानसिक तयारी आहे का? किती पालकांना त्यासाठी लागणाऱ्या कष्टांची जाणीव आहे? इथे एक गोष्ट सांगायला हवी की, माहिती असणं आणि जाणीव असणं ह्यात मूलभूत फरक आहे. खरं तर आयआयटी ची तयारी करण्याच्या capability वर ही एक परीक्षा हवी.**

म्हणजे असं की, तो/ती किती conceptual अभ्यास करत आहे ?, साधाणपणे मार्क्स कसे आहेत ?, परीक्षांचा तणाव येतो का ? किंवा फक्त परीक्षेच्या दरम्यानच अभ्यास होतो आहे की नियमीत अभ्यास चालू आहे ? नक्की कुठे अभ्यासाची चमक दिसते आहे ? असे एक ना अनेक प्रश्न सतत विचाराधीन रहायला हवेत. आणि जर सगळ्या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असेल, तरच IIT , NEET चा विचार करावा.

पालक म्हणून आपल्याला ह्या गोष्टी कळत असतात, जाणवत असतं की, आयआयटी हा आपल्या मुलाच्या इंटरेस्ट चा पार्ट नाहीये. कारण तर्कशुद्ध विचार केला तर, आयआयटी करावं वाटणं आणि त्याचा ध्यास लागणं ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.आणि म्हणूनच being a senior team member आपण पालकांनी ह्याकडे तटस्थ नजरेने बघणं गरजेचं आहे. आता काही लोकांचं असं म्हणणं असतं की, High Target ठेवलं की आपोआपच कमी टार्गेट सर करता येईल. पण खरच असं होतं ? Target हे नेहमीच achievable असावं. आणि तसं असेल तरच प्रयत्न होतात. अन्यथा निराशा येऊन काहीही न करण्याकडे कल जातो. मग आपल्या क्षमतेच्या पुढे काही प्रमाणात जाणं किंवा खूप अवघड target घेऊन प्रयत्न सोडूनच देणं ह्यातलं योग्य काय ?

आणि हेच कारण आहे की आयआयटी किंवा CET चा अभ्यासक्रम एक असला, तरी आयआयटी तर सोडा पण CET सुद्धा achievable Target रहात नाही. आयआयटी च्या प्रवेश परीक्षेची खोली एवढी आहे की, एक वर्षातच विद्यार्थी निराश होतात.आणि जाणीव होते तोवर अजून ६ महिने निघून गेलेले असतात. म्हणजे ११वी चं वर्ष आणि बारावीचे सहा महिने संपले. आणि मग तयारी सुरू करावी लागते ती बोर्डच्या परीक्षेची.

एक प्रचंड मोठं चक्रव्यूह आणि धडपड केवळ यातून बाहेर पडण्याची. आणि परिणीती केवळ आहे ते उरकून टाकण्यात आणि वाट बघण्यात होते. आजूबाजूला बघितले तर कळेल की दहावीला अगदी ९०-९५% घेणारी मुलं बावरून गेलीत आणि १२वीचं बोर्डचं टार्गेट त्यांना सर करता येत नाहीये.

मग पालकांनी नक्की काय करावं ? तर पहिलं काम करावं की, Senior पालकांशी भेटून बोलावं. बऱ्याच गोष्टी समजतील. आणि मुख्य म्हणजे आयआयटीचा किंवा NEET चा क्लास लावून दिला म्हणजे आपल्याला आता काळजीचं कारण नाही हे डोक्यातून काढून टाका. "आपण मुलांना क्लासेस लावले नाहीत असं व्हायला नको" अशी अपराधी पणाची भावना मनात आणू नका. तुमच्या मुलाला किंवा मुलीला आताच तुमची जास्त गरज आहे. प्रगती कशी आहे ह्याचे आकलन असू द्या.

आणि जर तुम्हाला किंवा पाल्याला असं जाणवत असेल की आयआयटी किंवा NEET हा आपला प्रांत नाही तर सरळ ते सोडून CET वर लक्ष केंद्रित करावे. वेळ वाचवून स्मार्ट काम करणे हे कधीही चांगले. कारण कसं तरी JEE करणे पेक्षा चांगल्या प्रकारे CET करणे ह्यात कोणताही कमीपणा वाटण्याचे काही कारणच नाही. JEE entrance ची तयारी केली तर आपल्याला CET तरी होईल हे अर्धसत्य आहे. कारण JEE च्या नादाने कोणतेतरी ५-६ chapters चांगले होतील ,पण त्या वेळात CET चा सोपा अभ्यासक्रम पूर्ण करता येणं शक्य होतं, ते मात्र हातातून निघून जाईल. अजून बरंच काही लिहिणं, बोलणं शक्य आहे परंतु आत्तासाठी एकच सांगता येईल की, आपल्या मुलांच्या क्षमता ओळखा आणि आयआयटी चं स्वप्न जागेपणी बघा. त्यात गुंतून पडून वेळ, पैसा आणि एनर्जी वाया घालवू नका. जसं कि चित्रपट आवडला नसेल, तर सरळ उठून येणारे आपण, पैसा गेला तरी चालेल पण वेळ नको असा विचार करतो ना ? मग इथे तर आपल्या मुलांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. अधिक काही बोलायचे असल्यास संपर्क करू शकता. ab.kate@gmail.com वर.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ ( महाराष्ट्र ) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत )आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 ( Maharashtra ) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar ( Maharashtra ) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * ( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court. ) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# कळी ते म्हसोबावस्ती कांबी रस्त्याचे तीन तेरा; शालेय विद्यार्थ्यांचे बेहाल

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**बालमटाकळी :** सुकळी ते कांबी, म्हसोबा वस्ती, गायकवाड जळगाव हा रस्ता साडेतीन किलोमीटरचा असून जवळच पाझर तलाव असल्यामुळे तलावाचे पाणी या रस्त्याकडे येत असल्याने रस्त्यावर गाळ साचत असून शालेय विद्यार्थ्यांना ह्या रस्त्यावरून जीव मुठीत धरून चालावे लागते , साधी दुचाकी वाहने देखील या रस्त्यावरून जाणे म्हणजे मोठी चालकाला कसरत करून जावे लागते, या खराब रस्त्यामुळे वस्ती शाळेतील व गावातील शाळेतील शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन देखील धोक्यात आले असल्याने आणि शिक्षकही खराब रस्त्यामुळे येण्यास दुर्लक्ष करीत असून रस्त्यांचे लवकरात लवकर काम करून रस्ता दुरुस्त करून द्यावा अन्यथा लवकरच शेवगाव गेवराई रस्त्यावर राज्य मार्गावर सुकळी फाटा येथे रस्तारोकोचे आयोजन देखील करण्यात आले आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या व शेवगाव तालुक्यातील गायकवाड जळगाव म्हसोबावस्ती कडून या गावाला पावसाळ्यात जाण्यासाठी रस्ता नाही, शालेय विद्यार्थ्यांना तीन किलोमीटर चिखलातून पायवाट काढून कसरत करावी लागते आणि चिखलाने भरलेल्या गणवेशात शाळेत जावं लागतं , चिखलातून जाताना पायी चालणारे तर सोडाच परंतु गाडीवाल्यांना देखील कसरत करून गाड्या चालवायला लागतात, अनेक विद्यार्थी या रस्त्यावरून चालताना चिखलात पडल्याने शाळेत देखील जात नाहीत ,शाळेचे शिक्षक देखील या रस्त्याने येण्यासाठी कसरत करतात परंतु रस्ता येण्या जाण्या योग्य नसल्यामुळे शिक्षक देखील शाळेत येण्यास दुर्लक्ष करतात, अनेक वयोवृद्ध व शालेय विद्यार्थी या रस्त्यावरून जाताना चिखलात पडलेले आहेत. लोकप्रतिनिधी मात्र झोपेचे सोंग घेत असल्यानेच रस्त्याचे तीन तेरा वाजले आहे ,म्हसोबा वस्तीवर येणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना चिखलातून मार्ग काढून शाळेला यावं लागतं, या रस्त्याविषयी नवनाथ केसभट, सोन्याबापू जाधव, अंबादास महाराज केसभट यांनी देखील मुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदार यांना पत्रव्यवहार अनेक दिवसांपासून केलेला असून देखील रस्त्याचे काम होत नाही हे दुर्भाग्य आहे , लवकरात लवकर या रस्त्याचे काम सुरू करून शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेऊन झोपलेल्या लोकप्रतिनिधींनी या रस्त्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याचे काम करून द्यावे, अन्यथा लवकरच शेवगाव गेवराई राज्य मार्गावर सुकळी फाट्यावर रस्ता रोको चे आयोजन करण्यात येणार असल्याचे या वस्तीवरील ग्रामस्थांनी सांगितले आहे.

# ऑनलाईन गेम्सवर बंदी घाला

## आ. प्रतिभाताई धानोरकर यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** हल्ली मोबाईल, टॅब किंवा टीव्हीवर ऑनलाईन गेम्स



खेळणं ही अनेकांची सवय झाली आहे. पण ही सवय आता व्यसनामध्ये परावर्तीत होऊ लागली आहे. त्यामुळे या गेमिंगवर नियंत्रण आणण्यासाठी ऑनलाईन गेम्स वर तामिडनाडू राज्याच्या धर्तीवर बंदी घालण्याची लोकहितकारी मागणी औचित्याच्या मुद्यावर बोलताना आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी सभागृहात सरकारला केली. एकेकाळी केवळ टाईमपास असलेलं ऑनलाईन गेमिंग आता अनेकांचे व्यसन आहे. आपल्या देशात ऑनलाईन गेमिंगची 'साथ' आली आहे. 24 तास तहान, भूक, झोप विसरून गेम खेळणारी तरूण पिढी तयार होत आहे. काही ऑनलाईन गेम्समध्ये पैसे कमावण्याची संधी असल्यामुळे जुगाराप्रमाणे त्यांचे व्यसन लागत आहे. सध्या राज्यात मोबाईल द्वारे अनेक ऑनलाईन गेम चा सुळसुळाट झाला आहे. या गेमद्वारे सर्रासपणे जुगार खेळाला जात असल्याचे निर्दशनास येत आहे. या जुगाराच्या विळख्यात तरुण पिढी तसेच लहान मुले सुध्दा गुंतलेली आहे. संपूर्ण पिढी बरबाद होण्याच्या मार्गावर आहे. या संपूर्ण ऑनलाईन गेम्स वर बंदी आणण्यासाठी यासंदर्भात खासदार बाळू धानोरकर यांनी लोकसभेत प्रश्न देखील उपस्थीत केला होता. अलीकडेच काही दिवसा आधी चंद्रपूर येथील देवाडा गावातील युवकाने ऑनलाईन रम्मी या खेळाच्या नादातून पत्नीची जीवन यात्रा संपून स्वतः आत्महत्या केली होती. असे अनेक प्रकार राज्यात घडत आहेत व हजारो कुटुंबे उध्वस्त होत आहे.

तामिलनाडू सकारने अलीकडेच अध्यादेश काढून ऑनलाईन च्या सर्व खेळांवर बंदी घातली आहे. बेटिंग आणि जुगारासह ऑनलाइन गेमवर बंदी घालण्यासाठी हा अध्यादेश काढला. ज्याद्वारे जुगार आणि ऑनलाइन गेमवर बंदी घालण्यात येणार आहे. मद्रास उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश के. चंद्रू यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीने ऑनलाइन गेमवर बंदी घालण्याची शिफारस केली होती. तसा अध्यादेश महाराष्ट्र सरकारने काढून युवा पिढीला यातून बाहेर काढावे त्याकरता महाराष्ट्र सरकारने सुद्धा यावर बंदी घालण्याची मागणी सभागृहात आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केली.



# भीमराज दाणे पाटील राज्य कोषाधक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** दि २३ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना DNE- १३६ ची राज स्तरीय सभा दौलताबाद येथे राज्य अध्यक्ष संजय निकम यांचे अध्यक्षतेखाली संपादक उमेशचंद्र चुल्बुले भारतीय कर्मचारी महासंघ , एल. जी. गायकवाड ( माजी राज्याधाम ), सुचिम घरत ( राज्य सरचिटनीस ) शिवाजी सोनवणे कायदे सल्लागार प्रमुख पाहुने उपस्थित होते या सभेत भिमराज दाने पाटील यांची राज्य कोषाध्यक्ष पदी बिनविरोध निवड करणात आली.


भिमराज पाटील दाणे यांना राज्य कोषाधक्षपदी नियुक्ती बद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी आर. डी. चौधरी ग्रामसेवक संघटना, प्रविण बापू नलावडे सरचिटणीस,बळीराम राठोड ,सुरेश काळवणे,गणेश धनवई,रमेश पाटील, रवि नाईक, संतोष मरमट, सागर डोईफोडे , कर्मचारी व ग्रामसेवक यांची उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta











# किशोरवयीन मुलीस आईचे पत्र

आधुनिक केसरी

**प्रिय मुलीस,**

बाळा, मला माहित आहे तुला वाचायला हे पत्र निश्चितच आवडणार नाही, कारण तुला वाटते, रोज रोज तेच सांगतेस, तेच ते ऐकवतेस मग काय वाचायचं. पण बाळा उलट सुलट विचारसरणीत तू वाचन संस्कृतीच विसरत चालली आहेस, मोबाईला द्यायला तासंतास तुझ्याकडे आहे, पण आईशी बोलायला एक क्षणही नाही... असो, तक्रार नाही करत. फक्त तू आनंदी रहावस, तुझं भविष्य उज्वल असावं त्यासाठीच ही सगळी धडपड. वर्तमानपत्रातील बातम्या, टीव्हीवरील मालिका, चित्रपट, मोबाईल वर दाखवले जाणारे अत्याचाराचे प्रसंग ह्या सर्व गोष्टीमुळे मनात भीती वाटत आहे, तू आपल्याच माणसांच्या, आपल्याच अवतीभोवतीच्या जगात असुरक्षित असल्याचं वाटतं म्हणून चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न...

तुझी पिढी अत्यंत हुशार, कलागुणी, स्मार्ट आहे परंतु तुझ्या पिढीचा एकच वाईट गुण आहे तो म्हणजे गोड बोलण्याला फसणं, लगेच क्षणाचाही विचार न करता विश्वास ठेवणं. मी असे नाही म्हणत विश्वास ठेवूच नको. पण थोडा विचार करशील तर, तुझं तुलाच उमगेल की तुझी खरी माणसं आई वडील सोडून कोणीच नाहीत. थांब... तु उलट विचार करू नको की, मी माझे मत तुझ्यावर लागते आहे. अगं असू देत की, तुझे मित्र मैत्रिणी माझी ओळख करून दे. फक्त मित्र मैत्रिणींची निवड करताना त्यांचं राहणीमान, त्यांची जीवनशैली, त्यांच्याकडे असणाऱ्या वस्तू पाहून मैत्री करू नको. तुझे मित्र मैत्रिणी निवडताना तू त्यांचे विचार बघ, सर्वांशी वागण्या बोलण्याची पद्धत बघ, त्यांचे आई-वडिलांविषयीचे विचार बघ, ती व्यक्ती तू सोबत असताना व तू सोबत नसताना एक सारखेच वर्तन करते का याचे निरीक्षण कर. या सर्व गोष्टींची खात्री करून घे आणि बाळा जेव्हा ह्या सर्व गोष्टी दोन ते तीन वेळा खात्री करून घेशील तेव्हाच विश्वास ठेव. मग बघ तुझे हे मित्र मैत्रिणी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत साथ देतील. मग तुमच्या करिअरच्या वाटा वेगळ्या झाल्या तरी, तुम्ही सतत एकमेकांच्या संपर्कात नसला तरी तुमचे ऋणानुबंध कायम टिकून राहतील; कारण हिऱ्याला चमक येण्यासाठी कोळशाच्या खाणीतच संघर्ष करावा लागतो, अग्नीचे चटके सहन करावे लागतात तेव्हाच तो मौल्यवान होतो. दगडाला सुद्धा टाकीचे घाव सोसावे लागतात तेव्हाच त्यालाही देव पण येते. मोठा वटवृक्ष तयार होण्यासाठी बीजाला स्वतःला जमिनीत गाळून घ्यावं लागतं तेव्हा कुठे त्याचा ऊन, वारा, पाऊस सहन केल्याने वटवृक्ष तयार होतो. म्हणून बाळा जे लगेच सहजासहजी मिळत आहे, ते बनावट आहे, ते अधिक काळ न टिकणारे आहे. मग ते यश असो की माणसं हे सदैव लक्षात राहू दे....



तृप्ती नितीन तोडकर
संपर्क क्र. 9322506052

जीवन जगत असताना संयम, स्वयंशिस्त, विवेक सहनशीलता, त्याग ह्या पंच सूत्रीचे पालन करशील तर गगन भरारी घेतल्याशिवाय राहणार नाहीस हा तुझ्या आईचा शब्द आहे. तू तुझ्या आयुष्यात जे करशील ते मागे वळून पाहताना तुलाच त्याचा पश्चाताप होणार नाही असे वर्तन कर. तु जे कर्म करणार आहेस त्याचेच फळ तुला मिळणार आहे हे मात्र कधीही विसरू नकोस बाळा. जसं सोशल मीडियाची प्रत्येक गोष्ट वाईट नाही तसंच प्रत्येक मित्र-मैत्रिणी वाईट नाही फक्त तुला ओळख करून घ्यायची आहे की, चांगलं काय आणि वाईट काय? तुझ्या हिताचं कोण आणि तुझ्या आयुष्याला चुकीचं वळण देणार कोण....

जाता जाता शेवटी एकच सांगेन की, तुझ्या आयुष्यात तुझ्याकडे डिग्री कमी असल्या तरी चालतील, तुझ्याकडे सुख सुविधा थोड्या कमी असल्या तरी चालतील, फक्त जे जाही असेल ते तुझ्या कष्टाचं असू देत, आणि महत्वाचं म्हणजे फक्त तुझ्याकडे सर्वोत्तम संस्कार असू दे, योग्य विचारांची संपत्ती अधिक असू दे हेच शुभाशीर्वाद...

तुला जे मला सांगायचं आहे, ते आता कळलं तर तुझं नि माझं जीवन सार्थकी लागेल पण, आता नाही मर्म समजलं तर तू आई झाल्यावर नक्कीच कळणार आहे. फक्त तेव्हा वेळ निघून गेलेली असेल म्हणून सावध हो बाळा. कारण तुझ्या आनंदात माझा आनंद आहे, तुझ्याच सुखात माझे सुख दडलेले आहे. बाळा तुला उदंड, आरोग्यदायी आयुष्य लाभो, सद विचारांची संगती लाभो, तुझं जीवन यशस्वी मार्गाने वाटचाल करीत मार्गस्थ राहो हीच सद्‌गुरू चरणी प्रार्थना.

**तुझीच आई**

# नात्यापलीकडचा स्नेहबंध : मैत्री



हर्षल श्रीकृष्ण वानखेडे,
वर्ग ९वा, परभणी
संपर्क क्र. ९८२३०६६६०६

आधुनिक केसरी

**ज्याच्याजवळ आपण मनातले सारे काही अगदी दिलखुलासपणे बोलू शकतो. ते नाते म्हणजे मैत्री... मैत्री हा रक्ताच्या नात्यापलीकडचा आगळावेगळा स्नेहबंध आहे. माणसाच्या जीवनात इतर नात्यांबरोबरच चांगल्या मित्र-मैत्रिणींची सुद्धा तेवढीच आवश्यकता असते. त्याच्या जीवनातील बऱ्याचशा सुखदुःखात मित्र मोलाची भूमिका बजावतात. चांगल्या मित्रांच्या संगतीत असणारे जीवनात काहीतरी आदर्श निर्माण करतात. व वाईट मित्रांच्या संगतीत असणारे अर्थातच स्वतःचे जीवन स्वतःच्याच हाताने उद्ध्वस्त करतात. म्हणून चांगले मित्र मिळणे खूप आवश्यक असते.**

मित्र हा सज्जन, प्रामाणिक निर्व्यसनी ,सदैव आपले हितचिंतनारा,संकटात सर्वात पुढे उभा राहणारा. आपल्या चुका वेळीच सांगणारा... असावा. त्याचबरोबर आपल्या एखाद्या चांगल्या गुणाचे, यशाचे भरभरून कौतुक करणारही असावा... आपला मित्र संकटात त सदैव साथ देणारा असावा... याविषयी एक छोटीशी कथा मला या ठिकाणी सांगावीशी वाटते. एक मुलगा बाबांशी गप्पा मारताना सहजच त्यांना सांगतो,"बाबा मला खूप मित्र आहेत." त्या मित्रांची एकामागोमाग नावेही तो सांगू लागतो. बाबा सर्व काही शांतपणे ऐकून घेतात. व नंतर मुलाला म्हणतात.,"बाळा तुला खूप मित्र आहेत हे ऐकून आनंद वाटला. परंतु खूप मित्र असण्यापेक्षा एकच चांगला मित्र असणे अधिक महत्त्वाचे असते. अनेक मित्र असूनही जर आपल्या संकटात एकही उपयोगी येत नसेल. तर अशा मित्रांचा काय उपयोग ?,"ते मुलाला पुढे सांगतात,"मैत्री कशी असावी हे तुला मी दाखवून देतो. त्यावेळी रात्रीचे अकरा वाजले होते. बाबांनी आपल्या एका मित्राला फोन केला. म्हणाले ,"मी आत्ताच्या आत्ता तुझ्या घरी येत आहे. आलो तर चालेल का ?"तिकडून मित्राचे उत्तर आले,"हे काय विचारणे झाले का ? तू माझ्या घरी केव्हाही येऊ शकतोस..."बाबांच्या मित्रांने का ? कशासाठी ? असे काहीच प्रश्न विचारले नाहीत. थोड्या वेळानंतर मुलगा व बाबा मित्राच्या घरी पोहोचतात. त्याचे दार ठोठवतात. क्षणाचाही विलंब न करता दार उघडले जाते. एका हातात नोटांचे बंडल व दुसऱ्या हातात एक मोठी काठी अशा अवस्थेत बाबांचे मित्र बाहेर येतात. हे पाहून मुलाला काहीच कळत नाही, तो विचारतो," काका एका हातात नोटांचे बंडल व दुसऱ्या हातात काठी घेऊन बाहेर



का आलात ? यावर काका उत्तर देतात.,"मला माझ्या मित्रावर पूर्ण विश्वास आहे तो कोणत्या तरी संकटात असल्याशिवाय एवढ्या रात्री माझ्या घरी येणारच नाही. एक तर त्याला पैशांची आवश्यकता असेल किंवा त्याला कोणीतरी विनाकारण त्रास देत असेल. म्हणून मी कोणताही प्रश्न न विचारता पैसे व हातात काठी घेऊन बाहेर आलो ."हे ऐकून मुलाला आश्चर्य वाटले. बाबांनी मित्राला सर्व हकीकत सांगितली."हे सर्व पाहून मुलाला बाबांचे म्हणणे पटले. तो बाबांना म्हणाला."खरंच बाबा तुमचे मित्र खूप ग्रेट आहेत. मी माझ्या मित्रांना कधी एखादी मदत मागितली तर ते टाळाटाळ करतात. जेव्हा माझ्याकडे पैसे असतात. तेव्हा माझ्याशी गोड -गोड बोलतात. व जेव्हा माझ्याजवळ काही नसेल तेव्हा मला टाळतात. पण तुमचे मित्र मात्र संकटातही तुम्हाला साथ देणारे आहेत ."आपल्या मुलाला खरी मित्रता कशी असावी हे कळले हे पाहून बाबांना आनंद झाला."

वरील छोट्याशा कथेतून आपल्याला मैत्री कशी असावी हे लक्षात येते. मित्र हा स्वार्थी नसावा. जर तो स्वार्थी असेल तर ती मैत्री टिकत नाही. मैत्री असावी तर कृष्ण आणि सुदामा यांच्या सारखी... त्यांच्या मैत्रीत गरीबी- श्रीमंती कधीच आड आली नाही. मैत्री असावी तर धर्मवीर छत्रपती संभाजी राजे व कवी कलश यांच्यासारखी... मरणाच्या दारात उभा असून सुद्धा मित्राची साथ न सोडणारे कवी कलश व राजे असूनही एका सर्वसामान्य व्यक्तीला तेवढाच जिव्हाळा देणारे छत्रपती संभाजी राजे हे खरोखरच आदर्श मित्र आहेत.

आज-काल आपण पाहतो. काही तरूण स्वतःचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मित्रांना घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी फिरण्यासाठी जातात. भरधाव वेगाने गाड्या चालवतात. मोटार सायकल वर व्हिडिओ शूट करतात. असे मित्र स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालतात. वाढदिवसाला मित्राच्या चेहऱ्याला केक लावणे, त्याला मद्य पाजणे. त्याच्याकडून महागड्या पार्ट्या वसूल करणे. म्हणजे मैत्री... अशी आजची मैत्रीची फॅशन होत आहे. मला वाटते तरुणांनी वेळीच सावध व्हावे. मित्र हा नक्कीच जीवाला जीव लावणारा असावा. परंतु तो स्वतः सह इतरांचा जीव धोक्यात घालणारा ही नसावा...

म्हणून मित्रांनो अशाच व्यक्तीशी मैत्री करा ज्याच्या परिस स्पर्शातून जीवनाचे सोने होईल... कारण आपले जीवन हे फक्त आपलेच नाही... तर ते आपल्याला जन्म देणाऱ्या आई -वडिलांचे, आपल्यासाठी स्वप्नं पाहणाऱ्या सर्व जीवलगांचे आहे... त्यामुळे त्या जीवनावर सर्वांचा सारखाच हक्क आहे. शेवटी सर्वांना परिसासारखेच मित्र लाभो व तुमच्याच आयुष्याचे सोने होवो हीच सदिच्छा...

# वाघाची डरकाळी घुमत राहावी



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**29 जुलै हा दिवस आपण "जागतिक व्याघ्र दिन" म्हणून साजरा करतो. वाघाचे जंगलातील अस्तित्व अबाधित राहावे, सुरक्षित व्हावे आणि ती वाघाची डरकाळी जंगलामध्ये घुमत राहावी यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाघ आणि माणूस यांच्यातला संघर्ष हा काही नवीन नाही. त्यामुळे वनविभागासमोर हा संघर्ष रोखण्यासाठी मोठे आव्हान असते. बऱ्याच वेळा वाघाच्या हल्ल्यात अनेक माणसांचे बळी जातात याला कारण म्हणजे मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड, आणि त्यामुळेच त्यांचा अधिवास मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहे.**

वाघाला संचार मार्गासाठी दाट जंगलाची आवश्यकता असते. पर्यायाने त्याचा जंगलाचा अधिवास कमी झाल्याने नकळत तो मानवी वस्तीकडे वळतो. मुद्दाम माणसांवर हल्ला करण्याचा त्याचा हेतू नसतो असे म्हणायला हरकत नाही.

हज्जारो पर्यटक अभयारण्यात भेटी देत असतात. निरनिराळे, प्राणी,पशू,पक्षी,ते बघतात.पण त्यांच खास आकर्षण असते ते व्याघ्रदर्शन. दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक "व्याघ्रदिन" साजरा केला जातो. २९ जुलै २०१० रोजी रशियातील सेंटपीटर्सबर्गला भरलेल्या व्याघ्र परिषदेत हा दिवस जागतिक व्याघ्रदिन म्हणून घोषित करण्यात आला. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला जगभरात जवळजवळ एक लाख वाघ होते असा अंदाज जाणकारांकडून व्यक्त केला जातो. तर काहींच्या मते ही संख्या चाळीस हजाराचे जवळपास सांगितली जाते. आता तर ही संख्या चार हजारावर इतकी खाली आली आहे. ९६/९७ टक्के वाघाची शिकार झाल्याने,नैसर्गिक मृत्यू आल्याने तिन ते चार टक्के म्हणजे ४०००/चे -जवळजवळ वाघ शिल्लक आहेत. या पैकी २२००/२३०० वाघ एकट्या भारतात आहेत. वाघाचे सरासरी आयुष्य साधारणपणे १४ ते १६-१७ वर्षाचेच असते.काही वाघ २०/२२ वर्षी मृत्यू झाल्याची नोंद आहे.

भारतातल्या वाघाची लांबी साधारणपणे साडे आठ ते ११ फूट असल्याचे आणि वजन दिड ते पावणे दोन क्विंटल असल्याचे सांगितले जाते.वाघ ताशी ६५ ते ७० कि.मि.वेगाने पळू शकतो. हत्ती सोडून ईतर प्राण्यांची शिकार तो करतो. भारतात असलेला वाघ हा रॉयल बेंगाल टायगर म्हणून ओळखला जातो.

आपला देश हा जगातील सर्वाधिक वाघ असलेला देश आहे. आणि म्हणूनच भारतासाठी या दिवसाचे विशेष महत्व आहे. वाघाचे माहेरघर म्हणूनही भारताची ओळख आहे. वाघाची संख्या जास्त असल्याने भारत ही शेवटची आशा आहे असे म्हणतात. भारतात वाघाला वाचवण्या साठी प्रयत्न होत आहेत. कोट्यावधी रुपये खर्च केले जात आहे. देशात ३९ व्याघ्रप्रकल्प आहेत. महाराष्ट्रात नागपूर विभागातील व्याघ्रप्रकल्पात वाघांची संख्या अधिक आहेत,असा पाहणी निष्कर्ष असल्यामुळे, नागपूर ही जागतिक दृष्टीने वाघांची राजधानी संबोधण्यात येते. चोरट्या शिकारी आणि नैसर्गिक अधिवास नष्ट होणे,ह्याच कारणांमुळे वाघांची संख्या झपाट्याने कमी झाली आहे. त्यामुळेच ही वाघाची डरकाळी लुप्त होते की काय ? अशी भिती निर्माण झालीहोती. वाघाच अस्तित्व धोक्यात आल होते..अन्नासाठी जवळच्या वस्त्यावर वाघ हल्ले करु लागले. अशा परिस्थिती वाघ आणि माणसाचे संबंध बिघडलेचे जाणवते. वाढत्या शहरीकरण आणि व्याघ्र क्षेत्राचा समतोल साधला जाणे साठी नियोजनबद्ध उपाययोजना आणि आवासाची आखणी होणे आवश्यक आहे. नाही तर हा संघर्ष सुरूच रहाणार आहे.परिस्थिती चिघळण्या आधिच शासकीय स्तरावर नैसर्गिक आपत्ती म्हणून दखल घेणे आवश्यक वाटते. स्वयंसेवी संस्था, जनजागृती साठी कार्यक्रम करत असतातच. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. जंगलात वाघ असणे म्हणजे संमृध्द जंगलाच प्रतिक आहे.महाराष्ट्रात ही संख्या २०१९ दोनहजार एकोणविस साला अखेर ३१२ च्या जवळपास होती. व्याघ्रदिन साजरा करत असताना या वाघाचे अस्तित्व कायम रहावे, वाघाची डरकाळी जंगलात ऐकू यावी या साठी सगळ्यांनी प्रयत्न केले पाहिजे. केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रलयाचे माहिती नुसार २०१२ ते २०१७ याकाळात ४५ टक्के वाघांचा मृत्यू अनैसर्गिक रित्या झाला.यात शिकार केलेल्या वाघाची संख्या २२ टक्के होती. २०१४ च्या गणणे नुसार देशात वाघांची संख्या २२२६ होती. तर जगभरात ३८९० वाघाची संख्या नोंद आहे.२०१८ साली ती.....महाराष्ट्रात ३०३ च्या जवळपास असल्याचे आकडेवारीत दिसते. वन्य जीव संस्थेच्या अहवालानुसार 2022 च्या व्याघ्र गणनानुसार महाराष्ट्रात जवळपास 446 वाघ आहेत. भारतातील एकूण वाघाची संख्या ही 3167 आहेत. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प हे भारतातील महाराष्ट्र राज्यात चंद्रपूर जिल्ह्यातील एक वन्यजीव अभयारण्य आहे हे महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि सर्वात मोठे राष्ट्रीय उद्यान आहे. पावसाळ्यात ताडोबा पार्कला भेट देणे हा एक पर्यटकांसाठी खास अनुभव असतो. महाराष्ट्रातील मेळघाट व्याघ्रप्रकल्प- अमरावती ,ताडोबा-अंधारी चंद्रपूर, पेंच व्याघ्रप्रकल्प- नागपूर, -संह्याद्री व्याघ्रप्रकल्प -कोल्हापूर ,नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्प- गोंदिया जिल्हा, बोर व्याघ्रप्रकल्प-वर्धा जिल्हा, विदर्भातच प्रकल्पांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्रात ४४६ च्या जवळपास वाघांची नोंद वनविभागा कडे असल्याची माहितीआहे. वाघाची संख्या कमी होण्याची कारण बघितली तर -शिकारी, विद्युत प्रवाहा धक्का,दोन वाघातला अधिवास संघर्ष यात वाघ मृत्यू पावले आहेत.

२०१६ सालात -१०० वाघांचा मृत्यू झाला.

२०१७ सालात -९८. वाघांचा मृत्यू झाला.तर

२०१८ सालात -१०० -वाघांचा मृत्यू झाला आहे.तसेच


गेल्या सात/आठ वर्षात मानव व वन्यप्राणी संघर्षात जवळपास पाचशेचे पेक्षा अधिक बळी गेले आहेत.विदर्भात ह्याचा फटका जास्त बसला आहे.वाघाची संख्या वाढत असलीतरी अधिवास कमी होत असले कारणांमुळे वाघ-आणी माणसातला संघर्ष वाढला आहे...तरीही वाघानं शिवाय जंगल नाही..

2022 च्या गळणे नुसार वाघाची आकडेवारी खालील प्रमाणे आहे... ताडोबा- 87, ब्रह्मपुरी ( चंद्रपूर )- 53, कर्हांडला ( नागपूर )-6, नागझिरा ( भंडारा )- 12, पेंच ( नागपूर )-41, बोर ( वर्धा ) 9, मेळघाट ( अमरावती ) 55, पांढरकवडा( यवतमाळ )- 12,पैनगंगा ( यवतमाळ )- 2, मध्य चांदा-12, भद्रावती( चंद्रपूर )-13, राजुरा( चंद्रपूर )-2,कन्हाळगांव ( चंद्रपूर )-12,जुनोना( चंद्रपूर )-21, बावनथडी( भंडारा )-13,गडचिरोली सर्कल-27, सावंतवाडी( सिंधुदुर्ग )-6, अशी आहे. अश्या जंगलात राहणारा हा जंगलाचा राजा, जंगलाचा श्वास आहे ,ज्याला बघण्यासाठी लाखो पर्यटक, आभयारण्याला भेटी देत असतात. कुठल्याही अभयारण्यात पर्यटक भेट देतात तेव्हा वाघाच दर्शन व्हाव ही अपेक्षा ठेऊन असतात.अनेक जंगली प्राणी दिसतात.पण वाघ दिसत नाही तो पर्यंत त्याची ट्रिप-पर्यटन पूर्ण होत नाही.त्याच कारणांमुळे पर्यटक आपला मुक्काम वाढवतात. गेल्या काही वर्षाची आकडेवारी बघितली तर,वाघ संपण्याची भिती निर्माण झाली होती.कारण वाघ संपला,नाहीसा झाला तर त्याची निर्मिती मानवाचे हाती नाही.

दरवर्षी जागतिक व्याघ्र दिनानिमित्त हेच आवाहन केले जाते.

आपण एक दिवसा पुरता तो दिवस साजरा करतो,मग त्याचा विसर पडतो.वाघ ही जंगल संपत्ती आहे.तिची जपणूक व्हायला हवी.अनेक देशांची आर्थिक घडी ह्या वन-जंगल संपत्ती वर बसली आहे.तेव्हा वाघानं सह ह्या वन संपत्तीचे रक्षण होणे,करणे हे आपल सगळ्यांच कर्तव्य आहे.वाघा शिवाय जंगलाची पूर्णता नाही. वाघाची संख्या महाराष्ट्रात झपाट्याने वाढत आहे आज साडेचारशे जवळपास वाघ महाराष्ट्रात आहे, आणि त्यातील सुमारे 200 पेक्षा अधिक वाघ हे चंद्रपूर जिल्ह्यासह ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात आहे.

२९ जुलै रोजी जागतिक व्याघ्रदिन साजरा करण्याचा उद्देश हाच कि वाघांच्या नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन करुन जनजागृती करणे. जेणेकरून वाघ आणि माणूस यांच्यातील संघर्ष वाढणार नाही. त्यामुळेच वाघांचे जंगलातले अस्तित्व टिकून राहणार आहे आणि जंगलात वाघाची डरकाळी सतत घूमणार आहे.



# मणिपूर... स्त्रियांची विटंबना आणि सरकारची नैतिक जबाबदारी

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २६

संभाजीनगर येथे दि.२६ जुलै रोजी विविध समुहातील महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता ते बॅनर होते, मणिपूर घटनेचा तीव्र निषेध शांतता रॅली मणिपूर येथे ४ मे रोजी घडलेली घटना जुलैमध्ये जनतेला कळते म्हणजे तब्बल तीन महिन्यांनी ती उघडी पडते. कमालीची संवेदनशील असलेली पोलीस यंत्रणा आणि त्याहूनही संवेदनशील असलेली पत्रकारिता....यांच्या नजरेतून ही घटना का व कशी निसटते ? हे प्रकरण निसटण्याच्या पाठीमागे कोणती कारणे आहेत, कोणती शक्ती आहे..ह्या शक्तीने स्त्रियांच्या वस्त्रहरणाचा, बलात्काराचा आणि खूणाचा इतका क्रूर आणि विकृत प्रकार का उघडा पडू दिला नाही ? यामागे कोणतं विशेष कारण आहे ? हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न का केला गेला ? तो कोणी केला ? याकडे मणिपूरच्या प्रशासनाने किंवा केंद्र सरकारने लक्ष न देण्याची कारणे काय आहेत ? याबाबत अनेक प्रश्न जनतेला पडलेले आहेत. ती कारणे हळहळू समोर येऊ लागली आहेत. अनेक स्त्रिया रस्त्यावर उतरल्या आहेत. अनेक स्त्रिया परखडपणे बोलत आहेत. सरळसरळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हेच का तुमचे अच्छे दिन वर बोलत आहेत. एकेरी बोलत आहेत. कारण स्त्रियांचा अब्रू चे धिंडवडे काढणाऱ्या घटनेने भारत देश पेटून उठला आहे. स्त्रियांना नग्न करून धिंड काढणाऱ्या देशात स्त्री ही सुरक्षित नसल्याची जाणीव आता समस्त स्त्री वर्गाला झाली आहे. तिची अब्रु चव्हाट्यावर आणून देश कोणत्या विकासाच्या गप्पा मारत आहे, कोणत्या संस्कृतीचे मॉडेल समाजासमोर ठेवत आहे. कोणत्या संस्कृतीचे मॉडेल जगासमोर ठेवत आहे, अशी क्रूरकृत्ये करणारा देश विश्वगुरू कसा बनेल..? असे अनेक प्रश्न स्त्रीयांना पडत आहेत.

औरंगाबाद येथील मोर्चातील स्रियां सवाल करत आहेत की, आम्ही शाळेच्या प्रार्थनेत रोज म्हणतो, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. ह्या प्रार्थनेतील बांधव कुठे आहेत ? आपल्या भगिनींना नग्न करून त्यांची धिंड काढली जाते, हा प्रकार देशाची प्रतिमा मलीन करणारा आहे....प्रत्येक स्त्री ही कुणाची तरी आई असते, कुणाची बहीण असते, कुणाची भावजय, कुणाची चुलती, काकू असते ह्यावेळी ह्या लोकांना स्त्रीची अब्रू चव्हाट्यावर आणतांना लाज वाटली नाही का ? ही केवळ मणिपूर राज्यातील स्त्रीची अब्रू चव्हाट्यावर आलेली नाही तर भारत देशाची अब्रू चव्हाट्यावर आलेली आहे.

मणिपूर राज्य हे भारताचा भाग आहे. म्हणून भारतातील केंद्र सरकारने या राज्यातील जनतेत होणारा सततचा संघर्ष कसा टाळता येईल. मणिपूरच्या प्रशासनाने स्त्रीची अब्रू घेणारे प्रकार, बलात्काराचे प्रकार, खूणाचे प्रकार असे विकृत प्रकार थांबविण्यासाठी कठोर पावले उचलावीत. आणि देशाची अब्रू वाचविण्यासाठी प्रयत्न करावेत. हा अत्यंत विकृत प्रकार लोकशाही देशाच्या संस्कृतीला काळीमा फासणारा आहे.

भारत हा अनेक जातीधर्माचा देश आहे. अनेक जातीधर्माच्या लोकांना संविधानाने त्यांचे हक्क दिलेले आहेत. प्रत्येक धर्माचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे असा कायदा असताना विद्यमान केंद्रसरकारने स्वतःचा धर्मच श्रेष्ठ आहे आणि तो इतरांनी स्वीकारावा अशा प्रकारच्या हिंदुराष्ट्राची कल्पना जनतेवर लादण्याचे प्रयत्न करत आहेत. परंतु उद्याच्या हिंदूराष्ट्रात अशाच घटना घडणार असतील तर या देशातील स्त्रिया व पुरूष हिंदूराष्ट्र ही संकल्पना स्वीकारतील का ?

विद्यमान पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी हे भारताला आधुनिक भारत किंवा नवाभारत करण्याचे स्वप्न पहात असताना एकिकडे अशांतता आहे. भांडण तंटे, जाळपोळ, मोर्चे, दंगली...हिंदू-मुस्लिम एकमेकांच्या विरोधात उतरविण्याच्या प्रकारांना थाबवणे नव्या भारतासाठी गरजेचे आहे.

या देशात तर सर्व धर्म समभावाची शिकवण दिली जाते. एकतेची, समतेची, बंधुत्वाची शिकवण दिली जाते. इथली न्यायव्यवस्था समन्यायी धोरणाचा स्वीकार करते. ज्यांची या देशावर आज सत्ता आहे तेच सांगतात,"आम्ही बुध्दाच्या देशातून आलोय..! असा बाहेरच्या देशात बुध्दाचा दिंडोरा पिटवला जातोय..बुद्ध म्हणजे प्रज्ञा,शील, करूणा,शांती, संयम, माणुसकी, जिव्हाळा, समता, बंधुता, एकता, स्वातंत्र्य, न्याय, मानवी हक्क होय.!.....आणि हे तर कधीच नष्ट झाले आहे. ते राजकारण्यांनी नष्ट केले आहे. सत्तेसाठी केले आहे. सध्या बुद्धाच्या देशात अशांती निर्माण झालेली आहे. अशा अशांती निर्माण करणाऱ्या लोकांच्या मुस्क्या का आवळल्या जात नाहीत ? या देशात दंगली का घडवल्या जातात ? ह्या देशात स्त्रिया का असुरक्षित आहेत..? स्त्रीयांची नग्न धिंड कोणत्या शासनाच्या काळात काढली जात आहे ? ती मुगलाच्या शासनकाळात काढली गेली नाही, ती इंग्रजी शासनाच्या काळात काढली गेली नाही किंवा गेल्या पंचाहत्तर वर्षात काढली गेली नाही हा प्रकार कोणाच्या सत्ता काळात होतोय ?

हे का घडतंय ? अशा विकृत प्रवृत्तीसाठी फाशी, जन्मठेप, काळेपाणी, अशी शिक्षा असेल तरच लोकांना या सरकारची भीती असेल..! नसता..

सरकारचा अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर सरकारचा अंकुशच नसल्याचा मॅसेज समाजात फिरेल. मणिपूरात सामाजिक संघर्षातून होणाऱ्या अशा कृतीला वेळीच आळा घालवून थांबवले तरच देशात शांतता नांदेल...! संभाजी ब्रिगेड मुंबईचे प्रदेश प्रवक्ते व कवी श्री प्रमोद शिंदे यांनी मणिपूरच्या स्त्रियांच्या घेतलेल्या अब्रूबाबत आपल्या एका कवितेतून सोशल मिडीयावर आक्रोश व्यक्त केला आहे त्यांच्या कवितेचं शीर्षक आहे ती बाई होती म्हणून... या शीर्षकाच्या कवितेतून कवी प्रमोद शिंदे यांनी हा आक्रोश मणिपूर येथे स्त्रीच्या अब्रुचे धिंडवडे काढणाऱ्या जमावाला उद्देशून केला आहे.



### ती बाई होती म्हणून

ती बाई होती म्हणून देश पेटला नाही,
जर का गाय असती तर, देश पेटला असता !
गल्लीतला सो कोल्ड हिंदू नेता चेतला असता !
भगवे झेंडे घेवून रस्त्यावर उतरला असता !
धर्म रक्षणासाठी दोन चार पुतळे जाळले
असते, काहींच्या फोटोला चपलाचे हार घातले
असते, जय हिंदुराष्ट्र म्हणत किंचाळला
असता, ओरडला असता !
पण ; आता ते होणार नाही
कारण ती बाई होती,
गाय असती तर देश पेटला असता !
इथे बाईला बाप्याच्या गर्दीत नागवं फिरवणं
शूरपणाचं मेडल ठरतं !
इथे पोरीला मंदिरातच पुजाऱ्याने बलात्कार
करणं पुण्य समजलं जातं !
इथे बलात्काऱ्यांना तुरुंगातून सन्मानाने
बाहेर काढून औक्षण केलं जातं !
बलात्कार हे वीर योध्यासाठी राजकीय
हत्यार मानलं जातं !
त्या देशात आणखीन काय होणार !
कारण ती फक्त बाई होती,
गाय असती तर देश पेटला असता !
कुठे गाय कापली म्हणून रान उठवणारे गांडू !
कुठे गायीचं मांस भेटलं म्हणून हत्याकांड
घडवणारे भडवे !
ब्रिजभूषणला पाठीशी घालणारे लंडचडे !
बाईला विधवा म्हणून हिणवणारे चौकीदार !
गांडीखालची लाल दिव्याची गाडी अन
तुरुंगाची बेडी वाचविण्यासाठी कमरेचं सोडून
देणारे नेते !
त्या देशात आणखीन काय होणार,
ती फक्त बाई होती,
गाय असती तर देश नक्कीच पेटला
असता!.....
सैतानाला तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी
रात्रीचं कोर्ट चालवणारी
सन्यासाला ट्रायलच्या नावाखाली तुरुंगात
खितपत ठेवणारी, चांडाळ न्यायव्यवस्था,
पत्रकारितेचा धंदा करून स्वत :चं शील
विकणारी पत्रकारिता !
लोकशाहीला बाजारात बसवून पोटाची
खळगी भरणारी निवडणूक व्यवस्था,
त्या देशात आणखीन काय होणार,
ती फक्त बाई होती,
गाय असती ना तर देश पेटला असता,
देश पेटला असता !.........

**प्रमोद शिंदे**
**भ्रमणध्वनी ९९६७०१३३३६**



# आशा स्वयंसेविकांचा शेवगाव पंचायत समिती ते तहसील मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील आशा व गटप्रवर्तक संघटना व भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने शेवगाव पंचायत समिती येथून तहसील कार्यालय शेवगाव येथे मोर्चा काढण्यात आला. यावेळी आशा व गटप्रवर्तक संघटनाच्या महिला कार्यकर्त्यांनी हातात फलक घेऊन सरकारच्या विरोधात मोठी घोषणाबाजी केली. आशा स्वयंसेवकांना शासकीय कर्मचार्याचा दर्जा देण्यात यावा, त्यांना किमान वेतन देण्यात यावे, त्यांना पेंशन व भविष्य उरार निर्वाह निधी देण्यात यावा, वार्षिक एक महिन्याची रजा देण्यात यावी तसेच मणिपूर येथे महिलांवर झालेल्या अत्याचाराचा निषेध ही यावेळी केला गेला.

यावेळी कॉम्रड सुभाष लांडे, संजय नांगरे, संदिप इथापे, भगवान गायकवाड, रामभाऊ लांडे, गोरक्ष काकडे, सय्यद बाबूलाल, बापूराव राशीनकर, संजय डमाळ, अशोक वाघमारे, आशा कर्मचारी संघटनेच्या अंजली भुजबळ, मिना भस्मे, सुवर्णा देशमुख, ज्योती गंगावणे, वैशाली देशमुख, संगीत रायकर, वनिता खर्चन सुमित्रा महाजन,सुनिता सोनटक्के,सिता थोरवे, स्वाती गाडेकर, परदेशी रंजना, सुनिता गांडुळे, सुशीला गंगावणे, पाचे अलका, इत्यादी अशा व गट प्रवर्तक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते. तसेच गुप्त वार्ता विभागाचे बाबासाहेब धाकतोडे ही यावेळी उपस्थित होते

यावेळी शेवगाव चे तहसीलदार प्रशांत सांगडे तसेच आरोग्य विभागाचे संकल्प लोणकर यांनी निवेदन स्विकारल व आपल्या मागण्या सरकार पर्यंत पोहचवण्याचे आश्वासन दिले.

# भाकपची मुसळधार पावसात निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आम्ही दंगलग्रस्त मनिपुरच्या नागरीकांसोबत, अशी हाक देत भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे मनिपुरमधील दंगलखोर व बलात्कार्यांवर कारवाई करा या मागणीसाठी देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणुन मदर टेरेसा चौक, छावणी येथे जोरदार निदर्शने करण्यात आली.

राज्य सरकार व केंद्र सरकार या दंगलीवर नियंत्रण आणायला अपयशी ठरली, प्रधानमंत्र्यांनी मनिपुरला भेटही दिली नाही, मौन बाळगले ,सर्वोच्च न्यायालयाने दखल घेईपर्यंत शांततेचे आवाहनही केलेले नाही! भाजपा कायदा आणि सुव्यवस्था नव्हे तर अराजकता आणायची आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने शहरात पत्रके वाटुन विभाजन, तुष्टीकरण आणि अधिकारांच्या उल्लंघनाविरुद्धच्या लढ्यात एकत्र येण्याचे आवाहन शहरातील शांतताप्रेमी नागरीकांना केले होते. भाकपचे खासदार कॉम्रेड विनय विश्वम, खासदार कॉ संदोष कुमार , महीला फेडरेशनच्या कॉम्रेड ॲनी राजा यांनी मनिपुरला जाऊन दंगलग्रस्तांची भेट घेतली, त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला , राज्यपालांना भेटुन दंगलखोरांना अटक करण्याची व दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनाची विनंति केली. हा हिंसाचार विशेषतः ख्रिश्चन समुदायाविरुद्ध होता आणि आम्ही त्याविरोधात ठामपणे उभे राहत आहोत असेही भाकपने पत्रकात म्हटले होते.

मणिपूरमधील अस्वीकार्य घटनांमुळे ख्रिश्चन समुदायाच्या वारशाने मिळालेल्या स्वातंत्र्याचे उल्लंघन झाले आहे, याबद्दल आम्हाला खेद वाटतो. असेही भाकपच्या पत्रकात म्हटले होते. आमचा विश्वास आहे की धार्मिक स्वातंत्र्य हा मानवी हक्कांचा एक महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग आहे आणि तो नेहमी परस्पर समंजसपणाने आणि सुसंवादाने राखला गेला पाहिजे.

ख्रिश्चन समुदायाचा अपमान करणे, त्यांची संपत्ती नष्ट करणे आणि दहशत माजवणे हे आपल्या सामाजिक आणि न्यायिक मूल्यांच्या विरुद्ध आहे. हा हिंसाचार सर्व अंल्पसंख्यांक मग ते मुस्लीम, ख्रिश्चन, शिख, जैन, पारशी इत्यादि विरोधात असु शकतो, असतोही. याविरुद्ध सर्व अल्पसंख्यांकांनी एकत्र यावे असे आवाहन केले होते . त्याप्रमाणे मोठ्या संख्येत नागरीक जमा झाले व त्यांनी मदर टेरेसा चौकात मुसळधार पाऊस असतांनाही जोरदार निदर्शने केली. यावेळी बलात्कारीयोकी भाजपा सरकार नही चलेगी, भाजपा वालो शर्म करो, मनीपुरकी मॉ बहनो हम तुम्हारे साथ है, नरेंद्र मोदी मुर्दाबाद , आरएस एस मुर्दाबाद, मनीपुरचे सरकार बर्खास्त करा, चर्च जलाना बंद करो, खिश्चनो के घर जलाना बंद करो, दंगेखोरोसे पुलीस की बंदुके वापस लो, अदाणी के लिए मनीपुर जलाना बंद करो,हिंदु, मुस्लीम, बौद्ध, सिख, ईसाई, पारसी, जैन, लींगायत, शिवधर्मी हम सब भाई भाई। ईत्यादी घोषणांनी मदर टेरेसा चौक दणाणला. ही निदर्शने 2 तास चालले, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ राम बाहेती, कॉ अभय टाकसाळ, कॉ तारा बनसोडे,कॉ अनिता हिवराळे, कॉ जफर फजलु रहमान , कॉ शहनाझ बेगम, कॉ तृप्ती फर्णांडीस कॉ विकास गायकवाड यांची भाषणेही झाली. यावेळी निदर्शकांमध्ये सर्व धर्माची नागरीक होते, त्यांच्या हातात लक्षवेधी फलके होती.



# प्रशासकीय इमारत व रस्त्यांसाठी १० कोटी

## माजीमंत्री आ. बबनराव लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार माजीमंत्री श्री बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नाला यश मिळाले असून परतूर नगरपालिका इमारत व रस्त्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत १० कोटी रु चा निधी आज मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार लोणीकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. राज्य सरकारच्या वतीने वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेअंतर्गत हा निधी नगरपालिकेला दिला जातो माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी परतूर नगर परिषदेला दिलेल्या याबरोबर निधीबद्दल आमदार लोणीकर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. शासनाकडून उपलब्ध होईल त्या जागेवर नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी शासनाच्या वतीने ०६ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे तर रस्त्यांच्या बांधकामासाठी ०४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आमदार लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये दिली आहे.

# शेतकऱ्यांच्या खात्यावर पीएम किसान योजनेचा चौदावा हप्ता

## राज्यातून 12980 ठिकाणी कार्यक्रमाचे प्रक्षेपण

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजस्थान येथील सीकर येथे विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित किसान संमेलनाच्या माध्यमातून पीएम किसान सन्मान योजनेच्या चौदाव्या हप्त्याचे देशभरातील साडे आठ कोटी लाभार्थी शेतकऱ्याना एका क्लिकवर वितरण करण्यात आले. याव्दारे महाराष्ट्रातील तब्बल 85 लाख 66 हजार लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 1866 कोटींचा चौदावा हप्ता वितरित करण्यात आला आहे. सीकर राजस्थान येथे पार पडलेल्या या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषी मंत्री धनंजय मुंडे तसेच मंत्री दादाजी भुसे यांनी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थान येथून ऑनलाइन पद्धतीने हजेरी लावली. यावेळी कृषी विभागाचे अधिकारी तसेच शेतकरी प्रतिनिधीही उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या वतीने यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, धनंजय मुंडे ll, दादाजी भुसे यांचे



स्वागत करण्यात आले, तसेच शासनाच्या वतीने कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.
दरम्यान कृषी विभागाच्या वतीने या कार्यक्रमात व्हर्च्युअल पद्धतीने शेतकऱ्यांना सहभागी होता यावे, यासाठी विशेष आयोजन करण्यात आले होते. कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालय, जिल्हा - तालुका कृषी कार्यालय, तसेच गावांमध्ये अशा राज्यभरात 12980 ठिकाणी या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले व याद्वारे राज्यातील सुमारे साडे पाच लाख शेतकऱ्यांनी या संमेलनात सहभाग घेतला. पीएम किसान सन्मान योजनेच्या धर्तीवरच राज्य सरकारने शेतकऱ्यांना वाढीव आणखी 6 हजार रुपये अर्थसहाय्य वर्षाला मिळावे यादृष्टीने नमो शेतकरी महासन्मान योजना सुरू केली असून, या योजनेच्या अंमलबजावणीला देखील लवकरच सुरुवात होईल, अशी माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली , तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार व्यक्त केले.

# महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळातर्फे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या ( मेस्को ). महाराष्ट्र शासन अंगिकृत.उपक्रम १८ जानेवारी २००२ ला माजी सैनिकांचे कल्याण व पुनर्वसन करण्याच्या हेतुने स्थापन करण्यात आले. "शिस्त बध्द सेवा" हे मेस्कोचे ब्रिद वाक्य आहे. विविध व्यावसायिक उपक्रम राबवून राज्यातील माजी सैनिकांना त्यांच्या जिल्हयात घराजवळ समाधानकारक रोजगार उपलब्ध करून देणे हा मेस्कोचा मुख्य उद्देश आहे. पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे यासाठी अनेक सामाजिक संस्था आणि पर्यावरण प्रेमी नागरिक विविध उपक्रम राबवितात. पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी अलीकडील काळात अनेक सामाजिक संघटना व संस्था पुढे येऊ लागल्या आहेत. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या ( मेस्को ) तर्फे प्रशंसनीय वृक्षारोपण अभियान हाती घेतला. सुपरवायजर मेजर मस्के साहेब यांच्या आदेशानुसार जिंतूर राज्य परिवहन महामंडळ परिसरात आज वृक्षारोपण करण्यात आले.



वृक्षारोपण करतांना मेजर डि.एस.कुटे, आजमत आर.पठाण, एस.एम.शेख.

# पत्रकार कदम यांना जीवन गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महात्मा कबीर समता परिषदेच्या वतीने दिला



जाणारा यंदाचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार सुनील निवृत्ती राव कदम यांना जाहीर झाला आहे. सुनील कदम हे गेल्या अनेक वर्षापासून मराठी पत्रकारीतेत कार्यरत असून त्यांनी बातमीदारीच्या माध्यमातून अनेक समस्यांना वाचा फोडण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या या समाज उपयोगी कामाची दखल घेऊन त्यांना नांदेड येथे दि १३ ऑगस्ट २०२३ रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात होणाऱ्या संस्थेच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. बिलोली तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांसाठी सातत्याने आपल्या दैनिकाच्या माध्यमातून ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत.

# हेल्मेट असेल तरच मिळणार शाळा-महाविद्यालयामध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** हेल्मेट असेल तरच कार्यालयात प्रवेश दिला जाईल अन्यथा मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल, अशा आशयाचे फलक शेवगाव शहरातील शाळा, महाविद्यालय व शासकीय कार्यालयांच्या प्रवेशव्दारावर लावण्यात आले आहेत. अहमदनगर परिवहन विभागाने वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे हे रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने हेल्मेट वापरासंबंधी शाळा महाविद्यालये शासकीय कार्यालयात येणाऱ्या वाहनधारकांना हेल्मेट वापर करण्यासंबंधी प्रबोधनात्मक व अंमलबजावणी विषयक मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार शाळा महाविद्यालये शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी विना हेल्मेट दुचाकीवरून आलेल्या दुचाकीस्वारांवर मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येणार असल्याच्या सूचना लेखी पत्राद्वारे कार्यालय प्रमुखांस देण्यात आल्या आहेत.

या मोहिमेत त्रिमूर्ती पब्लिक स्कूल शेवगाव, रेसिडेन्सीअल हायस्कूल शेवगाव, न्यू आर्ट कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव, पंचायत समीती कार्यालय शेवगाव आदी ठिकाणी हेल्मेट असेल तरच प्रवेश अशा आशयाचे फलक लावण्यात आले. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार यांच्या आदेशाने सहाय्यक मोटार



वाहन निरीक्षक सुरज उबाळे, राकेश जगताप, श्रीमती सुकन्या क्षेत्रे, श्रीमती प्रियांका उनवणे यांनी हा कार्यक्रम राबवला तसेच श्री स्वामी समर्थ मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक चंदन ढाकणे यांनीही या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# उरण क्रिकेट समालोचक असोसिएशनतर्फे गरजूंना अर्थसाहाय्य

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** क्रिकेट समालोचक असोशिएशन ही क्रिकेट खेळाच्या क्षेत्रातील समालोचक ( निवेदक ) यांची संघटना असून ही संघटना 13 नोव्हेंबर 2016 साली स्थापन झाली. फक्त क्रिकेट खेळाला प्रोत्साहन न देता शिक्षण व सामाजिक क्षेत्रात सुद्धा कार्यरत राहून गोरगरिबांना आधार देणे या दृष्टीकोणातून ही संघटना स्थापन झाली असून या उरण क्रिकेट समालोचक असोशिएशनच्या माध्यमातून आजपर्यंत 12 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या 27 मुलींचा शिक्षणाचा खर्च करण्यात आला आहे. एक मूलगी पोलीस भरतीसाठी तर दुसरी मुलगी इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. तसेच या संस्थेच्या माध्यमा तून दरवर्षी आदिवासी वाडीवर व मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटपही केले जाते.

गोरगरीबांना अर्थ सहाय्य देण्याचा कार्यक्रम यावर्षी श्रीराम मंदिर चिर्ले ( उरण )येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाची प्रस्तावना संघटनेचे अध्यक्ष प्रसाद भोईर यांनी केली. प्रस्तावनेत त्यांनी असोसिएशनचे ध्येय व उद्दिष्टे काय आहेत ती सांगितली. त्यानंतर श्रीराम मंदिर चिर्ले ( उरण )येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात एकूण 6 मुलींना पुढील शिक्षणासाठी अर्थ सहाय्य करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी सुधाकर भाऊ पाटील ( सरपंच चिरले ), सुनील नरेश कडू सोनारी ( युवा उद्योजक ), समाधान माळी चिरले( उद्योजक ),गोपीनाथ म्हात्रे जासई( उद्योजक ), गुरुनाथ तांडेल सुरूनपाडा ( सामाजिक कार्यकर्ते ), सुनील शाताराम मढवी,विश्वनाथ म्हसकर नारिवली ठाणे( उद्योजक ),राजन कृष्ण घरत,निवृत्ती धनाजी पाटील, प्रमोद रामानाथ माढवी ( शाखा प्रमुख ), रवींद्र कासुकर ( दादरपाडा ), सत्यवान म्हात्रे ( वळवली ), श्रीकांत पाटील



( गावठाण ) आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी ह्या उरण क्रिकेट समलोचक असोसिएशनच्या समाजपयोगी कार्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन रोख धनादेश सुद्धा सुपूर्त केला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उरण क्रिकेट समलोचक असोसिएशनचे सल्लागार आत्माराम म्हात्रे यांनी तर असोशिएशनचे खजिनदार प्रल्हाद कासुकर व सचिव मेघनाथ मढवी यांनी आभार प्रदर्शन केले. उरण क्रिकेट समलोचक असोसिएशनच्या माध्यमातून समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीतून शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळत असल्याने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीही असोसिएशनचे यावेळी आभार मानले आहेत.



# वाटुर- जिंतूर-जालना महामार्गावर पावसाचे पाणी

## सा. बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** जिंतूर जालना महामार्गावरील वाटुर फाटा येथे रोड लगतच्या नाली तुंबल्याने पाणी जाण्यास मार्ग नसल्याकारणाने पावसाचे पाणी पूर्ण रोडवरून वार्ड क्रमांक पाच रस्त्याने गल्लीबोळा त वाहत असल्याने वाटूर रहिवाशांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे गल्लीबोळ्यात पाणी सातत्यातून तीन वर्षापासून जेसे थे परिस्थिती असुन येथील रहिवाशांना हा त्रास सहन करावा लागत आहे. वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभाग मंठा अधिकाऱ्यांना वाटुर येथील रहीवासीं यानी निवेदन तक्रारी करून सुद्धा अद्याप महामार्गावरील नाल्याचे साफसफाई करण्यात आलेली नाही. नाल्यावरील दुकानदाराने अतिक्रमण केल्यामुळे नाल्या मध्ये पाणी जाण्याचा मार्ग नसल्याने सर्व पाणी रोडवर घंटोनघंटे थांबत असुन वाहत आहे. पाण्यामुळे महामार्गावरील खड्डे पडल्याने वाहनधारकांना वेगाने जात येत असल्याने छोटे-मोठे अपघात घडून येतात तसेच वाटूरकरांना दरवर्षी पावसाळ्यात याचा मोठा त्रास होत असुन याचा चांगलाच सामना करावा लागत आहे. वेळोवेळी तक्रार करून सुद्धा काम होत नसल्याने गल्लीबोळात पाणी साचून जमा होते ज्यामुळे नागरिकांना मुलांना गॅस्ट्रोची लागण होऊन आरोग्य धोक्यात येत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे त्वरित लक्षवेधुन महामार्गावरील पाऊसाच्या साचलेल्या पाण्याची योग्य ति विल्हेवाट लावावी. नसता समस्त गावकरी संबंधित व्यापारी उपोषण करण्याच्या मार्गावर असुन मोठे जणअंदोलन कर ज्यात येणार अमल्याचे बोलले जाते.



# घर सोडलेल्या तुकारामला केले पालकांच्या स्वाधीन: समतोल प्रकल्पाची कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**जळगाव :** बालकल्याण समितीने तुकाराम व्हरकटे वय : १७ वर्ष रा. पूर्णाड , ताः मुक्ताईनगर, येथील असून दि.२६/७/२३ बुधवार रोजी बालकाला घरी सोडण्याचा आदेश समतोल प्रकल्पाला दिला. हा बालक दि १२/७/२०२३ रोजी बाल कल्याण समिती , मुंबई उपनगर यांचेकडून बदलीवर बाल कल्याण समिती, जळगाव यांचेकडे हस्तांतरण करण्यात आलेला होता, सदर बालकास काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समिती, जळगाव यांचे आदेशाने मुलांचे बालगृह जळगाव येथे तात्पुरत्या संरक्षित निवार्यासाठी दाखल करण्यात आलेले होते .

बालकाचे आई वडील मेंढ्या चारण्याचे काम करतात , वडिलांच्या अनुपस्थितीत मेंढ्या कडे लक्ष देणारे कुणीच नसल्याने बालकाचा ताबा घेण्यास ते जळगाव येथे येऊ शकत नव्हते. बालकास सुरक्षित घरपोहच करणेकामी त्वरित इस्कॉट उपलब्द नसल्याने जळगाव बाल कल्याण समितितर्फे समतोल प्रकल्पाला इस्कॉट ऑर्डर मिळालेली होती.त्यानुसार समतोल चे प्रदिप पाटील व महेंद्र चौधरी आम्ही या बालकाने सांगितलेल्या पूर्णाड फाटा , ताः मुक्ताईनगर , जि : जळगाव या पत्त्यावर जाऊन सुखरूप आई व वडील यांच्या ताब्यात मुलाला देण्यात आले अशी माहिती प्रदीप पाटील यांनी दिली.

# कर्णबधिर बालकावर नागपूर येथे डॉ. जीवन वेदी यांनी केली नि:शुल्क शस्त्रक्रिया

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** तालुक्यातील कुरान पिंप्री येथील दीड वर्षीय बालकाला जन्मतः ऐकू येत नसल्याने यांची संपूर्ण माहिती मिळताच पैठणचे भूमिपुत्र तथा नागपूर येथील नाक, कान, घसा विभागप्रमुख यांनी निशुल्क कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी केली आहे.

पैठण तालुक्यातील कुरान पिंप्री येथील प्रवीण कुंढारे यांचा मुलगा वेदांत 8 महिन्याच्या असतांना तो दोन्ही कानाने ऐकत नसल्याचे परिवाराला माहित झाले याबाबत तज्ञ डॉक्टरने तपासणी केली असता याला पुष्टि मिळाली नंतर मुंबई, पुणे, छत्रपति संभाजीनगर येथील विविध दवाखाण्यात तपासणी व चाचणी केली असता लाखो रूपयाचा खर्च होणार असल्याचे सांगितले.

यावर परिवार चिंतित असताना डॉ सूरज बटुळे, नानक वेदी, भगवान घटे यांच्याशी चर्चा केली असता पैठणचे डॉ. जीवन वेदी यावर उपचार कारित असून यांच्याशी संपर्क साधला. यावर डॉ. जीवन वेदी यांनी स्वत पैठणला येऊन प्रवीणची भेट घेऊन शासकीय सवलतीतून ऑपरेशन करण्यासाठी चाचणी व रिपोर्ट काढण्याचा सल्ला दिला.

या सर्व रिपोर्टद्वारे 12 जुलै 2023 रोजी नागपुर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ( मेयो ) येथे

नाक ,कान ,घसा विभागप्रमुख डॉ जीवन वेदी यांच्याद्वारे त्यांच्या सहकारी डॉक्टर ने वेदांत कुंढारे या बालकावर कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी केली त्यानंतर वेदांतला 8 दिवसांत सर्व तपासणी करून त्याला वातावरणातील सर्व आवाज ऐकु येत असल्याची खात्री करून योग्य काळजी घेऊन पैठण ला पाठविन्यात आले. डॉ जीवन वेदी यांनी सांगितले की पैठण हे माझे जन्मगाव असून तालुक्यातील श्रवणदोष असलेल्या बालकावर शस्त्रक्रिया करून सेवा दिल्याचा अभिमान आहे पद्मश्री डॉ मिलिंद कीर्तने यांच्या प्रेरणेनुसार आता पर्यंत जवळपास 90 बालकावर केंद्र व राज्य सरकारच्या विशेष अनुदानातून गोर गरीब नागरिकांच्या बालकावर निशुल्क कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया केल्या आहे या योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क साधुन जन्मतः बहिरेपनापासून मुक्ति मिळविण्यासाठी प्रयत्न करावे.

प्रवीण कुंढारे याने सांगितले की माझ्या मुलगा बहिरा असल्याचे दुख आमच्या परिवाराला झाले होते. त्यासाठी अनेक दवाखाने व वाटेल तितका खर्च करून मुलाला यातून बाहेर काढण्याचे प्रयत्न होते मात्र पैठण येथील डॉ जीवन वेदी यांच्या प्रयत्नाने व यांच्या सहकार्याने निशुल्क ऑपरेशन करून मुलाला सर्व सामान्य जीवन जगण्याचा मार्ग दाखविला त्याबद्दल मी आयुष्यभर ऋणी राहील.

तसेच 5 वर्षाच्या पर्यंतच बालकावर उपचार होत असल्याने यासाठी मी स्वत व ओम सामाजिक संघटना, डॉ. सूरज बटुळे, कहार समाज संघटना जनजागरण करणार असल्याचे सांगितले.

# सोयगाव तहसीलदारपदी मोहनलाल हरणे

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्याच्या तहसीलदारपदी मोहनलाल हरणे यांची नियुक्ती झाली असून त्यांनी आपला पदाचा पदभार सोमवारी स्वीकारला.सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांची छत्रपती सिल्लोड तहसीलदारपदी बदली झाल्याने सोयगाव तालुका तहसीलदार पद रिक्त झाले होते. त्यांच्या जागी मोहनलाल हरणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या आठवडा भरापासून सोयगाव येथे नवीन तहसीलदार कोण येणार ? याबाबत सतत नवनवीन चर्चा रंगत होत्या. हरणे यांच्या नियुक्तीने आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. नवनियुक्त तहसीलदार मोहनलाल हरणे यांचे सोयगाव महाराष्ट्र राज्य तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भारत पगारे, गोकुळसिंग राजपूत, राजू दुतोंडे, विजय काळे, रवींद्र काटोले, शेख सुलेमान, पूनम परदेशी, व वृक्षारोपणाद्वारे स्वागत करण्यात आले. सोयगाव तालुका हा विकासाच्या दृष्टीकोनातुन एका वेगळ्या उंचीवर जावा, सर्वसामान्य शेतकरी, विद्यार्थी कष्टकरी व शोषितांना न्याय मिळावा याच हेतू तहसिलदार मोहनलाल हरणे यांचा आहे. शेतकऱ्यांच्या समस्याप्रथम प्राधान्याने सोडविणार असल्याने शेतकऱ्यांना कोणताही त्रास होऊ देणार नाही असे ते पदभार स्वीकारताना म्हणाले.



# प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचे कृषी विभागाच्या वतीने प्रक्षेपण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत चौदावे हप्त्याचे वितरण माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत सिकर राजस्थान येथून वितरण करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने प्रत्येक गावात टीव्ही मोबाईल लॅपटॉप द्वारे शेतकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेले होते. तसेच पैठण शहरात माननीय तहसीलदार सारंग चव्हाण व तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाठ पंचायत समिती कृषी अधिकारी रामकृष्ण पाटील भाजपा तालुकाध्यक्ष सुनील शिंदे, विस्तार अधिकारी कृषी श्री शैलेश सरसमकर यांच्या उपस्थितीत विकास कृषी सेवा केंद्र पैठण जय जनार्दन कृषी सेवा केंद्र पैठण श्री स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र पैठण येथे आयोजित करण्यात आलेली होते.



# परसोडा लिज क्षेत्रातील संपूर्ण जमिनीचे अधिग्रहण करावे

## राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या आयुक्तालयातील सुनावणीत हंसराज अहीर यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आरसीसीपीएल च्या परसोडा लाईमस्टोन माईन लिज क्षेत्रातील इतर मागासवर्गीय व अन्य प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या 756 हेक्टर शेतजमिनी भूमी अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्व्यवस्थापन कायदाअंतर्गत ( LAAR Act ) संपादीत करण्याचे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या सुनावणीत दिले. कंपनीने 756 हेक्टर पैकी केवळ 295 हेक्टर जमिन अधिग्रहीत करण्याची जिल्हाप्रशासनाकडे आवेदनाद्वारे केलेली मागणी अयोग्य असून संपूर्ण 756 हेक्टर शेतजमिनीच्या संपादनाकरीता आवेदन सादर करावे अन्यथा कंपनीने या लिजचा ताबा सोडावा अशी भूमिका घेत अहीर यांनी आयुक्त व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना या प्रकरणी उद्योग व खणन विभागाकडून इत्यंभूत माहिती घेवून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्याची सुचना केली.दि. 24 जुलै 2023 रोजी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर येथे आरसीसीपीएलद्वारा परसोडा लाईमस्टोन लिज क्षेत्रातील भूसंपादन व अन्य विषयावर राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या सुनावणीला आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदारी, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे सचिव राजीव रंजन, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, आरसीसीपीएलचे वरीष्ठ उपाध्यक्ष तमाल पाल, आरसीसीपीएल मुकूटबनचे प्लांट हेड अभिजीत दत्ता, पुनर्वसन तसेच भूसंपादन विभागाचे अधिकारी व प्रकल्पग्रस्त शेतकरी बांधव उपस्थित होते.या सुनावणीत एनसीबीसी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी सागीतले की, कंपनीने पेसा अंतर्गत असलेल्या गावातील संपादीत जमिनीचा तपशिल मागवून खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले असल्यास रजिस्ट्री प्रत तपासून शासकीय दरापेक्षा कंपनीने नियमानुसार योग्य दर दिला किंवा नाही याची शहानिशा जिल्हाधिकाऱ्यांनी करावी असे निर्देशीत केले. लाईमस्टोन लिज मिळाल्यानंतर कंपनीद्वारा मायनिंग, पर्यावरण व अन्य बाबींची मंजूरी प्राप्त करण्यास ग्रामसभेचा ठराव व जनसुनावणी घेतली होती त्यात बहुतांश शेतकऱ्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या असल्याच्या अनेक तक्रारी आयोगाकडे आल्याने जिल्हा प्रशासनाने या गंभीर



प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी अशी सूचना एनसीबीसी अध्यक्षानी केली असता. जिल्हाधिकाऱ्यांनी जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमूण चौकशी केली जाईल असे सांगीतले.

या सुनावणीमध्ये पुर्वाश्रमिच्या निजामांच्या नावे असलेल्या जमिनी निजामांनी आदिवासी बांधवांच्या नावे केल्या होत्या. त्या शेतकऱ्यांकडे जमिनीचा 7/12 उपलब्ध असतांना लिज मिळाल्यानंतर काही शासकीय अधिकाऱ्यांशी संगणमत करीत आदिवासींचे कुळ हटवून निजामांचे कुळ कागदपत्री दाखवित मध्यस्थांच्या माध्यमातून या जमिनी कंपनीला विक्री केल्याने आदिवासींचा न्याय हक्क हिरावल्या गेला आहे. त्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करावी व अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशा सुचना NCBC ने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

लिज परीसरातील पेसा क्षेत्रामधील अनु. जमाती शेतकऱ्यांच्या जमिनी अन्य तालुक्यातील व्यक्तींच्या नावे कंपनीच्या माध्यमातून खरेदी करण्यात आल्या. अशा व्यवहाराची माहिती जिल्हा प्रशासनास देण्याची तरतूद असतांना तसे न करता परस्पर जमिनीची खरेदी विक्री केल्याच्या तक्रारी असल्याने याची सविस्तर माहिती घेवून आयोगास अहवाल सादर करण्याच्या सूचनाही या सुनावणीत आयोगाने केल्या. सदर प्रकार उद्भवला असल्यास या खरेदी विक्रीचे व्यवहार रद्द करण्याचे निर्देश आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी जिल्हा प्रशासनास दिले.

सदर सुनावणीच्या वेळी विभागीय आयुक्तांनी कंपनी प्रबंधनाद्वारे जमिनीला दिल्या जाणाऱ्या दराची शहानिशा करीत निर्धारीत दर निश्चित करावा व शेतकऱ्यांमध्ये याबाबत जागृती केली जावी असे निर्देश जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले. संबंधित शेतकऱ्यांना कंपनीला थेट जमिनींची विक्री करावयाची नसेल तर किमान 80 टक्के शेतकऱ्यांनी याबाबत जिल्हा प्रशासनास LAAR Act नुसार जमिनींची खरेदी करण्याविषयी आवेदन करावे तसेच कंपनीद्वारा परस्पर खरेदी केलेल्या जमिनींच्या आजपर्यंतच्या व्यवहारात अल्प दर किंवा आर्थिक फसवणूक झाली असल्यास शेतकऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी अशी सुचना विभागीय आयुक्तांनी या सुनावणी दरम्यान केली.

# माधुरी मिलिंद देशमुख अदवंत आयोजित अधिकमासाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** माजी नगरसेविका माधुरी मिलिंद देशमुख अदवंत यांनी अधिकमासाचे औचित्य साधून वरद गणेश मंदिरात सहस्त्रआवर्तन व मेहूण पूजन आणि सहभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. माधुरी मिलिंद देशमुख अदवंत यांच्या अधिकमासाच्या कार्यक्रमात मेहूण व सहस्त्रावर्तन चाळीसहून अधिक जोडप्यांना मिष्टान्न भोजनाच्या नंतर अधिकमासाचे वाण आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरातील अनेक मान्यवर जोडप्यांनी अधिकमासाच्या व सहस्त्रआवर्तनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते. माजी नगरसेविका माधुरी मिलिंद देशमुख अदवंत त्यांचे पती मिलिंद देशमुख यांची कन्या -जावयाचा विशेष सहभाग या अधिकमासाच्या कार्यक्रमात होता.माधुरी मिलिंद देशमुख अदवंत यांच्या या अधिकमासाच्या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मित्रमंडळींनी मोलाचे परिश्रम घेतले होते.



# 'पीएम किसान' शेतकऱ्यांचा ऑनलाइन सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम किसान योजनेमधील चौदावा हप्त्याचे वितरण आज राजस्थान राज्यातील सिकर येथून करण्यात आले. सदर कार्यक्रमात फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला.

फुलंब्री तालुक्यामध्ये असलेल्या किसान समृद्धी केंद्रामधून तसेच कृषी विभागाने खेडोपाडी आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमातून शेतकऱ्यांनी सदर कार्यक्रमाचा प्रत्यक्ष सहभाग नोंदविला. फुलंब्री येथे तहसील कार्यालयाच्या वरील हॉलमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास किमान 110 शेतकऱ्यांची उपस्थिती होती तहसीलदार डॉक्टर कृष्णा कानगुले व तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांनी ऑनलाइन सहभाग नोंदवला. यावेळेस प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाची कृषी व्यवस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असून सल्फर युक्त सल्फर कोटेड युरिया गोल्ड आता नव्याने शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादित केले. कार्यक्रमानंतर भारत कासार यांनी कृषी विभागाच्या विविध योजना संदर्भात माहिती दिली. कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# धनगर समाजाचे 'ढोल बजाओ' आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाचा मेंढी पालन हा कुटुंबातील सदस्यांच्या उदारनिर्वाहचा मुख्य व्यवसाय आहे, परंतु दिवसेंदिवस वनराई चराई क्षेत्र कमी कमी होत चालल्याने मेंढी पालन व्यवसाय डबघाईस आलेला आहे. म्हणून याकरिता जय मल्हार सेनाचे अध्यक्ष लहु शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शिवाजी काटकर यांच्या सह आदींनी औरंगाबाद जिल्हा वनसंरक्षक अधिकारी यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन दिले.

या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील धनगर समाजाचा मेंढी पालन व्यवसाय आहे, त्या कुटुंबातील सदस्यांच्या उदारनिर्वाहचा मुख्य व्यवसाय आहे. मेंढपाळन आपापल्या गावाच्या शेजारील डोंगराळ भागात मेंढीचराई दिवसेंदिवस करतात. कालांतराने वनविभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणात वनीकरण करण्यात आले असून, विविध वनक्षेत्रात वेळोवेळी बदल करण्यात आले आहे.

यामुळे वनक्षेत्र दिवसेंदिवस कमी कमी होत चालले आहे. यामुळे राज्यातील धनगर समाजातील मेंढी पालन व्यवसायिकांचे अतोनात नुकसान होत आहे. मेंढी पालन व्यवसाय हा संकटात सापडला आहे, औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील गणोरी, बाबरा, सिल्लोड तालुक्यातील शिवना, आमसरी, अजंठा सोयगाव तालुक्यातील रावळा जावळा, गलवाडा, वरमाळ, बनोटी , कन्नड तालुक्यातील किन्ही,प ळसी यासह आदी ठिकाणी वन विभागाचे अधिकारी जाणुन बुजून अडचणी निर्माण करून मेंढपाळ व्यवसायकांची पिळवणूक करत आहे. गेल्या काही वर्षांपासून धनगर समाज बांधव हा व्यवसाय करत आहे. वनक्षेत्र अधिकारी मेंढी पालन व्यवसायिकांना त्रास देण्याचा प्रयत्न केला जात आहे . तो त्रास तात्काळ थांबवा नसता या करिता जय मल्हार सेनाच्या वतीने 21 -8 -2023 रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात येईल.

यात दिलेल्या निवेदनात औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शिवाजी काटकर, दत्ता मेत्रे, कारभारी दांगोडे,सुर्याभान सोनवणे, सुचित्रा शिंदे, यादव गवारे, गयाबाई सावळे, गोविंद भोजने , पांडुरंग दुधे , सुनील दुधे,माधव जाधव, सुभाष साबळे,बाळु आयनर, दादाराव गायके , विठ्ठल कोरडे, नाना साबळे, श्रावण हसे, श्रीहरी पाटील यांच्या सह आदींची निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.




|| नमो ||

शुभ कार्य तुमचे व्यवस्था आमची



विनोद मंडप डेकोरेटर्स अँड केटरर्स

लग्न, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, वास्तूशांती, शुभ कार्याच्या ऑर्डर स्वीकारल्या जातील.

प्रो.प्रा. विनोद जोगदंडे

9158500727, 8446185722

टाऊन हॉल, व्हीआयपी रोड, छत्रपती संभाजीगर

# पूरसंरक्षण भिंत बांधून कायमस्वरूपी उपाययोजना करा : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अल्पशा पावसाने चंद्रपूरात वारंवार पुरपरिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या भागात जिवीतहाणी होण्याची शक्यताही बढावली आहे. त्यामुळे आता याचे योग्य नियोजन करुन भविष्यात उद्‌भवणा-या पूरपरिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करत येथील नदीकाठच्या संपूर्ण भागत पूर संरक्षण भिंत बांधण्यात यावी अशी मागणी अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.

मुंबई येथे सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरातील पूरपरिस्थितीचा प्रश्न लावून धरला आहे. आज अधिवेशनाच्या नवव्या दिवशी औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी पून्हा एकदा हा विषय मांडत वारंवार उद्‌भविणा-या पूरपरिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

यावेळी बोलताना ते म्हणाले कि, चंद्रपूर शहराच्या पश्चिमेला वाहणाऱ्या इरई नदीकाठा जवळील परिसरातील सिस्टर कॉलनी, रेहमतनगर या भागात कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. पावसाळयात अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी या सखोल



नागरी भागात शिरत आहे. सन २००६, २०१३ आणि २०२२ तसेच या वर्षी सुद्धा या भागात पुरपरिस्थीती निर्माण झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात या भागातील घरांचे नुकसान होवून वित्तहानी झाली आहे. दरवर्षी सखोल भागात पूर परिस्थिती उद्‌भवत आहे. त्यामुळे भविष्यात उद्‌भवणार्या संभाव्य पुरपरिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

या विषयाची गंभीरता लक्षात घेत राज्य शासनानेही पुरसंरक्षण भिंत बांधकामाचा प्रस्ताव तयार करण्याबाबतचे निर्देश जलसंपदा विभागाला दिले असून तसा प्रस्तावही तयार करण्यात आला आहे. मात्र सदर प्रस्तावात दाताळा पूल ते शांतीधाम या इरई नदी काठावरील परिसराची लांबी २.०० कि. मी. आहे. तसेच ज्या परिसरात पुराचा धोका पोहचत नाही तो भाग वगळुन उर्वरीत १.० कि.मी. लांबी मध्ये पुर संरक्षक भिंत व घाट बांधकाम प्रस्तावित करण्यात आलेले आहे. परंतु सदर पूर संरक्षण भिंतीची लांबी अतिशय कमी असल्याने शहरातील इतर भागात इरई नदी पात्रातील पाणी शिरून नेहमीप्रमाणे पूर परिस्थिती उद्‌भवण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे चंद्रपूर येथे दरवर्षी उद्‌भवणारा पुरामुळे होणारी जीवितहानी, पशुधन नुकसान, नागरिकांचे होणारे आर्थिक नुकसान, नागरिकांचे विस्थापन व स्थलांतरण तसेच आपत्ती व व्यवस्थापन वरील खर्च टाळण्याकरिता संपूर्ण इरई नदी परिसरात पुर संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास मंजुरी प्रदान करत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी त्यांनी यावेळी सभागृहात बोलताना केली आहे.





# शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर:** येथून जवळच असलेल्या घायाळवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी आचल काशिनाथ रजाळे हिने शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यातून दुसरा क्रमांक मिळवल्याबद्दल ग्रामपंचायतच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच पांडू साखरे, जगनराव पवार, ओं कार सिंह शेखावत, कोंडीराम सावंत, विनायक झिने, जुमान शाहा, गुलाबराव मगरे, मनोहर घायाळ, दत्ता घायाळ, तसेच मुख्याध्यापक भगवान घायाळ शिक्षक खंडागळे सर यांसह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.






# शांताराई महाविद्यालयामध्ये वृक्ष लागवड करून फडणवीस यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह दिनानिमित्त 53 वृक्षाची लागवड मा. आमदार प्रशांत जी बंब यांच्या मार्गदर्शनाखाली शांताराई प्राथमिक, माध्यमिक व कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ताजनापुर ता.खुलताबाद येथील संस्थेच्या वतीने सेवा निवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत आलोने सर यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगीशालेय समितीचे अध्यक्ष दगडु काळे प्राचार्य गणेश काळे प्रा. सुनील इनामदार, कोमल इंगळे मॅडम प्रत्यक्ष आहेर, बहुरे मॅडम अतुल गुळवे, भगवान साळुंखे, किरण काळे, शालेय अध्यक्ष दगडू काळे शिक्षक कल्पना काळे उपस्थित होते.






# कारगील विजयदिनानिमित्त शहिदांना वंदन

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** कारगील विजय दिवस हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाच्या दिवसांपैकी एक आहे.शहीद सैनिकांच्या बलिदानाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा करण्यात येतो.या दिवसाच्या सन्मानार्थ आजचा २४ वा कारगिल विजय दिवस म्हणून साजरा करण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शहीदांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांच्याहस्ते भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी मिन्नू पी.एम व अपूर्वा बारसू,निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कैलास देवरे, उपजिल्हाधिकारी ( महसूल ) मोहन जोशी,जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी सागर हवालदार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमती बुवनेश्वरी यांनी उपस्थित वीर पत्नी शांताबाई सरकटे, पार्वतीबाई दगडू लहाने यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाला जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे कल्याण संघटक संजय देशपांडे, वरिष्ठ लिपिक रामधन राऊत,रविंद्र डोंगरदिवे,दिनेश आपटे, जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार श्रीमती सविता डांगे,मीरा पुरोहित यांच्यासह विविध विभागातील कर्मचारी,माजी सैनिक उपस्थित होते.

आज कारगिल विजय दिवसाचे औचित्य साधत शहीद जवान स्व.अमोल गोरे यांच्या गावी मौजे सोनखास येथे वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन कल्याण संघटक संजय देशपांडे यांनी केले.





# सरपंचाने ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील विकासकामे परवानगी घेऊन करावीत

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** जिल्ह्यासह तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सरपंचाची परवानगी न घेता परस्पर कामे केली जात आहे म्हणून या करिता महाराष्ट्र राज्य ग्रामसंवाद सरपंच असोसिएशन या संघटनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उप अभियंता खुलताबाद यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.तर यात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालय क्षेत्रातील सरपंच व उपसरपंच यांची पुर्व परवानगी न घेता परस्पर कामे केली जात आहे. हे चुकीचे प्रमाण आहे, तालुक्यातील ग्रामपंचायत मधील गावठाण हद्दीततील विकास कामे करत असताना आपल्या विभागाच्या वतीने सरपंचांना माहिती दिली जात नाही.ही माहिती देणे नियमानुसार बंधनकारक आहे, जो निधी गावासाठी येतो तो निधीची मंजुरी ग्रामपंचायतीच्या वतीने ठराव घेण्यात येते. त्या निधीचा विनियोग कसा करावा हे ग्रामपंचायत ठरवते, असा असताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सरपंचांना माहिती दिली जात नाही.या मागचे गौडबंगाल काय ? सरपंच हा कायद्यानुसार ग्रामपंचायत लेव्हलला २९ विभागाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो, आम्हाला प्रशिक्षण दिले जाते , सरपंच यांना मुख्यमंत्री एवढा अधिकार असतो तेवढाच अधिकार आहे.

गावातील सरपंच यांच्या विना परवानगीने गावात एकही रुपया खर्च करू शकत नाही. असा असताना सार्वजनिक बांधकाम विभाग ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांची स्वाक्षरी घेत प्रशासकीय मान्यता देण्यात येते.याची संपुर्ण माहिती तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंच यांना लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य ग्रामसंवाद सरपंच असोसिएशन यांच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी ग्राम संवाद सरपंच असोसिएशनचे अध्यक्ष करणसिंग राजपुत, सरपंच झरी वडगाव, सरपंच रेणुका खंडागळे, नेहा काळे, काकासाहेब अधाने, बाबासाहेब वाकळे, दगडु भेंडे, चंद्रकला राठोड, योगिता अंबेकर, कचरू साबळे, संदीप गायकवाड, विमलबाई अधाने, ज्ञानेश्वर मातकर, राजश्री देवगिरीकर, जिजाबाई महाले, शिल्पा जाधव, सरिता नागे, जिज्ञाशा काळे यांच्यासह आदी सरपंचाची निवेदनावर स्वाक्षऱ्या आहे.

## दीपक केसरकर कोल्हापूर दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील पूरग्रस्त परिस्थिती लक्षात घेऊन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी तातडीने कोल्हापूरकडे लक्ष पुरवले आहे. ते सोमवारी दिवसभर जिल्ह्याच्या विविध ठिकाणी पूरस्थितीची पाहणी करून आढावा बैठक घेणार आहेत. पूरग्रस्तांना दिलासा मिळावा अशी कृती पालकमंत्री व शासनाने करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नदी व धरणातील पाणीसाठा वाढत चालला आहे. पंचगंगा नदीने ३९ फूट ही इशारा पातळी पहाटे ओलांडली. दिवसभरात त्यामध्ये आणखी एक फुटाने वाढ झाली आहे.

## नाशिक येथे सर्पदंशाने दोन महिलांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन महिलांचा सर्पदंशाने मृत्यू झाला. या प्रकरणी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. मालेगाव तालुक्यातील आघार येथील प्रतिक्षा पवार यांना घरातच साप चावला. हा प्रकार इतरांच्या लक्षात येताच तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत सिन्नर येथील शशिकला आव्हाड ( ३६ ) या काम करत असता ना उजव्या पायाला साप चावला. हा प्रकार मुलाच्या लक्षात आला. त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## विहिरीत गुदमरल्याने शेतमजुरांचा मृत्यू

### दोन्ही शेतमजुरांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा:** शेतात रोवणीसाठी आलेल्या मजुरांना जवळच्या विहिरीत एक कासव दिसला, कासव पकडण्याचा मोह न आवरल्याने तिघे मजूर विहिरीमध्ये उतरले. मात्र आत गुदमरल्यामुळे त्यांपैकी दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना लाखनी तालुक्यातील पेंढरी गावालगतच्या मोगरा – शिवनी शेतशिवारात आज बुधवारी घडली. दयाराम सोनिराम भोंडे, वय ३६ आणि मंगेश जय गोपाल गोंधळे, वय २६ अशी मृत शेतमजुरांची नावे आहेत.गढ पेंढरी गावातील विष्णू गायधने यांच्या शेतात रोवणीचे काम सुरू होते. यासाठी लगतच्या मेंढा भुगाव येथील मजूर कामावर होते. बुधवारी सकाळी शेताच्या बाजूला असलेल्या जुनाट विहिरीत कासव दिसल्याने हे शेतमजूर विहीरीत उतरल्याची माहिती आहे. मात्र आधी उतरलेला बेशद्ध झाल्याने दुसरा उतरला. या दोघांनाही पुन्हा वर येताच आले नाही. त्यांना वाचविण्यासाठी सुधीर मोरेश्वर हजारे हा शेतमजूरही विहीरीत उतरला. मात्र त्याला श्वास घ्यायला त्रास होऊ लागल्याने तो कसाबसा वर आल्यामुळे बचावला.

ग्रामस्थांच्या मते, हे मजूर पाणी काढण्यासाठी आत उतरले होते, तर काहींच्या मते कासव पकडण्यासाठी उतरले होते. घटनेची माहिती लाखनी पोलिसांना मिळताच पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने दोन्ही प्रेत बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविले. दोनही शेतमजुरांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## मणिपूर : आदिवासी टायगर सेना, धाराऊ छत्र तर्फे निषेध

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** गेल्या काही दिवसांपासून मणिपूरमध्ये जातीय हिंसाचार शिगेला पोहोचला आहे. दररोज हिंसाचाराच्या नवनवीन घटना समोर येत आहेत. आता येथील हिंसाचाराने क्रूरतेचा कळस ही गाठला आहे. तीन महिलांची निर्वस्त्र धिंड काढून सामूहिक बलात्कार करण्यात आला असल्याचा आरोप होत आहे तर देशभरातून या घटनेचा निषेध व्यक्त केला जात आहे. धुळे जिल्ह्यातून आदिवासी टायगर सेनाकडून ही या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला असून या घटनेतील आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हा प्रशासनाला ही देण्यात आला आहे. तर धाराऊ छत्र प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुरेखा नांद्रे यांनी देखील केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे.मणिपूर येथील अत्याचाराची व्हिडिओ क्लिप पाहिल्यानंतर आपण आजही रानटी अवस्थेत जीवन जगत आहोत का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर अशा अतिशय दृष्ट हुकूमशाही दर्शक मनमानी करणारी प्रवृत्ती नष्ट होण्या कामी या घटनेतील मुख्य आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी ही त्यांनी केली आहे. तर या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी आदिवासी टायगर सेनेचे महाराष्ट्र राज्य सचिव अॅड. प्रवीण मोरे, अॅड. नितीन म्हसदे, तालुका अध्यक्ष गोविंद अहिरे, तसेच धाराऊ छत्र प्रतिष्ठानचे अध्यक्षा सुरेखा अशोक नांद्रे यावेळी उपस्थित होत्या.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर